# स्वदेशाभिमान.

किंमत [illegible] आणे.

नि.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. १८९०

# स्वदेशाभिमान.

ह्या गुणाचीं

अनेक उदाहरणें.

विनायक कोंडदेव ओक.

मुंबईः

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

१८८९.

किंमत दोन आणे.

## हें पुस्तक लिहिलें कशासाठीं ?

ह्याचें उत्तर एवढेंच कीं, स्वदेशाभिमान हा गुण केवढा मोठा आहे, आणि ह्याच्या परिपूर्णतेसाठीं इतर विद्याचारसंपन्न राष्ट्रांतल्या लोकांनीं कायकाय केलें आहे, तें कळावें, ह्यासाठीं हें पुस्तक लिहिलें आहे.

# अनुक्रमणिका.


आणखी पुष्कळ मारतों तर बरें झालें असतें. ... ... ३१
आमचे हक्क आम्हांकडे राहूं दिले तर तुम्ही आमचे राजे.... २
खरमरीत प्रार्थना. ... ... ... ... ... ६
तुम्ही तेथें आम्ही. ... ... ... ... ... २५
त्या तेजापुढें आमचें कांहीं चालावयाचें नाहीं. ... ... ६
द्रव्य नको; स्वदेशाभिमान पाहिजे. ... ... ... ८
पांढरा झेंडा आणि तांबडा झेंडा. ... ... ... ३
पूर्वजांच्या अस्थि देखील शत्रूंच्या हातीं लागूं द्यावयाच्या नाहींत. २२
बहुमान शस्त्रास्त्रांत आहे. ... ... ... ... ३६
मरण पतकरलें; देशाचा अपमान नको. ... ... ... ३
मरणाचा दिवस तो सुखाचा दिवस. ... ... ... ५
मरा देखील. ... ... ... ... ... ... १०
मरायाचें; पळायाचें नाहीं. ... ... ... ... १४
माझें घर आहे, एवढ्यावरून तें राखून ठेवूं नका. ... ४
माझें घर जळालें म्हणून काय झालें. ... ... ... १
म्हातारीचा स्वदेशाभिमान. ... ... ... ... १५
राज्याधिकार नको; स्वदेशस्वातंत्र्य पाहिजे. ... ... २०
स्वतःच्या यशापेक्षां राष्ट्राचें यश मोठें. ... ... ... २
स्वदेशहितार्थ जीवंत पुरून घेणें. ... ... ... ... ९
स्वदेशाभिमानार्थ जिवावर उदार. ... ... ... १७
स्वदेशाभिमान आणि राष्ट्रस्वातंत्र्य. ... ... ... २८
स्वातंत्र्य द्या; नाहींतर मरण द्या. ... ... ... ... १८
स्वाभिमानापेक्षां स्वदेशाभिमान अधिक. ... ... ... ११
स्वीडन स्वतंत्र कसें झालें. ... ... ... ... ... १३
हानि सोसायास मी तयार आहें. ... ... ... ... ७
ही तरवार घे. ... ... ... ... ... ... १

नि. ७४
मराठी ग्रंथ संग्रहालय
Bay B-

# स्वदेशाभिमान.

## " ही तरवार घे. "

अमेरिकन लोक आणि इंग्लिश लोक ह्यांच्या लढाया चालल्या असतां, स्टोनो येथें जी लढाई झाली, तींत कर्नल ओवेन राबर्टस् हा जखमी होऊन पडला. त्याचा मुलगा त्याच लढाईंत होता; त्याला हें बापाचें वर्तमान कळतांच तो मोठ्या त्वरेनें त्याच्या जवळ आला. त्यास अत्यंत खिन्न झालेला पाहून, तो मरणोन्मुख पुरुष, मोठ्या गांभीर्यानें त्याला ह्मणाला, " बाळा, तूं अशा प्रसंगीं आलास हें पाहून मला परमसंतोष झाला आहे. ही तरवार घे; हिला अपमान अद्यापपर्यंत कधीं शिवला नाहीं; आणखी, तुझ्या देशाच्या स्वातंत्र्यावर जें महत्संकट आलें आहे, त्याचें निरसन होई तोंपर्यंत हिला विसावा देऊं नको. सलाम. जा आतां लवकर तूं आपल्या कामावर. " !

---

## " माझें घर जळालें ह्मणून काय झालें ? "

अमेरिकन लोक आणि इंग्लिश लोक ह्यांच्या लढाया चालल्या असतां, असें झालें कीं, एका संस्थानामध्यें जेकब मोटी ह्मणून कोणी एक गरीब बाई होती, तिच्या घरांत इंग्लिश लोक थारा धरून राहिले; आणि त्या घरास आग लावून द्यावी, असा विचार अमेरिकन लष्करांत ठरला. तो विचार लेफ्टनेंट कर्नल ली ह्यानें त्या बाईस कळविला. तेव्हां, तिला तिळभर देखील वाईट वाटलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर ती त्याला मोठ्या उल्हासानें ह्मणाली, " माझें घर जळालें ह्मणून काय झालें ? तें जळाल्यानें माझ्या देशाचें कार्य अल्प तरी जर साधत आहे, तर तें घर सा-

थकीं लागलें, असें मी समजेन; आणि तें जळतांना मी आनंदानें पाहीन." ह्या केवळ तोंडच्या गप्पा नव्हत्या. ह्या घरास आग लावण्यास कोलतें खरोखर त्या बाईनें आपल्या हातानें तयार करून दिलीं!!

---

## "आमचे हक्क आह्मांकडे राहूं दिले, तर तुह्मी आमचे राजे."

स्पेनदेशामध्यें आरागान ह्मणून एक प्रांत आहे. तेथल्या बडे लोकांनीं, स्पेनदेशाच्या राजाच्या राज्याभिषेकसमयीं जी शपथ घेतली, तीवरून असें दिसतें कीं, ते जरी स्वराजनिष्ठ होते, तरी स्वातंत्र्याचें पाणी त्यांच्यामध्यें पुष्कळ वसत होतें. ती शपथ अशीः—"आह्मी, आरागान संस्थानांतले सरदार, प्राचीन काळापासून स्वतंत्र आहों. ते महाराजांच्या बरोबरीचे आहों, किंवा थोडे अधिक ह्मटलें तरी चालेल. हे आह्मी सगळे आपणां महाराजांस आमचे राजे असें कबूल करितों. पण त्यांत एक मोठी अट आहे. ती ही कीं, महाराजांनीं आमचे अधिकार आणि आमचे हक्क आह्मांकडे अगदीं अढळ चालूं दिले पाहिजेत; त्यांत अंतर पडूं देतां कामास नये. तर तोंपर्यंत मात्र महाराज आमचे राजे. पण ह्यांत जर अंतर पडलें, तर आह्मी महाराजांस आमचे राजे असें कधींही मानणार नाहीं."

---

## स्वतःच्या यशापेक्षां राष्ट्राचें यश मोठें.

प्राचीन ग्रीस देशांतील स्पार्टा संस्थानामध्यें पिडार्टस ह्या नांवाचा एक चांगला शिकलेला तरुण गृहस्थ होता; आणि त्या संस्थानाच्या दरबारांत तीनशें जागा गुणावगुणपाहून भरावयाच्या होत्या. त्यांतली एक आपणांस मिळण्याविषयीं तो प्रयत्न करीत होता. प-

रंतु, त्यांतली एकही जागा त्याला मिळाली नाहीं. तेव्हां, त्याला फार वाईट वाटलें असेल असें समजून त्याचे स्नेही त्याचें सांत्वन करूं लागले. त्यांस तो ह्मणाला, "तुह्मी माझें सांत्वन कशाला करितां ? मला कांहीं वाईट वाटलें नाहीं, एवढेंच केवळ नव्हे; तर उलटा संतोष झाला आहे. कां कीं, ह्या झालेल्या प्रकारावरून अगदीं स्पष्ट असें दिसून आलें कीं, आमच्या ह्या संस्थानांत, माझ्यापेक्षां गुणांनीं अधिक असे तीनशें लोक आहेत."

---

## पांढरा झेंडा आणि तांबडा झेंडा.

पोलंडाचा ड्यूक बोलेसलास ह्यानें इ० स० ११०७ ह्या वर्षी बेलगार शहरास वेढा घातला. आणि आंतल्या लोकांकडे, आपल्या एका हलकाऱ्याबरोबर, एक पांढरा आणि एक तांबडा असे दोन झेंडे त्यानें पाठवून दिले. आणि त्यांस कळविलें कीं, साम करायाचा असल्यास पांढरा झेंडा ठेवून घ्या, आणि लढाई करायाची असल्यास तांबडा झेंडा ठेवून घ्या. तेव्हां त्या लोकांनीं ते दोन्ही झेंडे ठेवून घेऊन त्या हलकाऱ्यास असें सांगितलें कीं "आह्मी हे दोन्ही झेंडे ठेवून घेतों. आणखी तुह्मी बोलेसलास ह्यास असें कळवा कीं, आह्मी हा पांढरा झेंडा ठेवून घेतला आहे, ह्याचा आशय असा कीं, आमच्या मनांत साम करावयाचा आहे. आणि तांबडा झेंडा ठेवून घेतला आहे, ह्याचा आशय असा कीं, तो साम जर आह्मांस मिळाला नाहीं, तर त्याच्या प्राप्त्यर्थ आह्मी रक्तपात करण्यास सिद्ध आहों."

---

## "मरण पतकरलें; देशाचा अपमान नको."

मेजर आंड्रे हा एक इंग्लिश सरदार होता, त्याला अमेरिकनांनीं पकडून ठेविलें होतें; आणि सेंट आगस्टाइन किल्ल्यां कर्नल ग्लेझर ह्या इंग्लिश सरदाराच्या ताब्यांत ग्याडसडेन

ह्या नांवाचा एक मोठा अमेरिकन सरदार पुष्कळ दिवस प्रतिबंधांत होता. तिकडे आंड्रे ह्यास ठार मारणार अशी वदंता कर्नल ग्लेझर ह्यास कळतांच, त्यानें ग्याडसडेन ह्यास सांगून पाठविलें कीं, आंड्रे मेला कीं तुमचीं शंभर वर्षें पूर्ण झालीं ह्मणून तुह्मीं समजावें. हा निरोप ज्या शिपायानें सांगितला त्याला ग्याडसडेन ह्यानें असें ह्मटलें कीं, "तूं परत ग्लेझर ह्याला जाऊन सांग कीं, मी आपल्या देशाच्या हितार्थ तुह्मी ह्मणाल तेव्हां मरायास तयार आहें. लढाईच्या कायद्यानें ह्मणा, भिऊन ह्मणा, किंवा मायाजाळांत गुंतून ह्मणा, कांहीं झालें तरी वाशिंग्टन हा स्वातंत्र्याचा पक्ष कदापि सोडणार नाहीं. तें कांहीं असो. पण, मी आपला जीव विकून माझ्या राष्ट्राचा अपमान विकत घेण्यापेक्षां, फांशीं जायाच्या खांबावर मोठ्या उल्हासानें चढेन. मरण पतकरलें देशाचा अपमान नको."

---

## "माझें घर आहे, एवढ्यावरून तें राखून ठेवूं नका."

यार्कटौन ह्यास अमेरिकन लोकांनीं वेढा घालून, त्यावर तोफांचा भडिमार चालविला, आणि त्यानें भोंवतालचीं सगळीं घरें पडलीं, तरी, त्यांचा सेनापति जनरल नेलसन ह्याचें घर अगदीं जशाचें तसें राहिलें होतें; आणि त्यांत कांहीं इंग्लिश लोक लपून राहून मजा मारीत होते. हें नेलसन ह्याच्या दृष्टीस पडलें, तेव्हां त्याला विलक्षण आश्चर्य वाटलें; आणि शोधांतीं त्याला असें कळलें कीं, तें घर आपल्या सेनापतीचें आहे असें जाणून शिपाईलोक त्यावर गोळे सोडीत नाहींत. तेव्हां त्यांस तो ह्मणाला, "तें घर माझें आहे, एवढ्यावरून तुह्मी तें राखून ठेवूं नका. तें माझें आहे, हें असें तुह्मांला ठाऊक आहे, तसें इंग्लिशांनाही ठाऊक आहे; आणि तें तुह्मी कोणी उडविणार नाहीं, असें समजून ते आपले खुशाल चैन करीत बसले आहेत. त्यांचा बचाव माझ्या घरांत व्हावयास नको. तुह्मी बेलाशक

त्यावर गोळे सोडा, आणि त्यावर बरोबर नेम कसा मारतां तो मला आतांच्याआतां पाहूंद्या बरें !" त्याप्रमाणें त्या शिपायांनीं प्रथम एक गोळा सोडल्याबरोबर त्यांतले दोन इंग्लिश लोक मरण पावले, आणि बाकीचे पळून गेले.

---

## मरणाचा दिवस तो सुखाचा दिवस.

ग्रीसदेशामध्यें थीब्स आणि स्पार्टा ह्या दोन संस्थानांचीं युद्धें चाललीं असतां, थीबन लोकांचा सरदार, उरांत भाला लागून, रणांगणीं घायाळ होऊन पडला. त्या प्रसंगीं त्याच्या देहाचें भान त्याला राहिलें नाहीं; पण त्याचा जीव सगळा त्याच्या शस्त्रास्त्रांकडे लागला होता. कां कीं, तीं शस्त्रास्त्रें शत्रूच्या हातीं लागूं नयेत, अशी त्याला फार इच्छा होती. त्यांविषयीं शोध करितांकरितां, कोणीं एका त्याच्याच मनुष्यानें त्याचीं सगळीं शस्त्रास्त्रें त्याला आणून दाखविलीं, तेव्हां त्याला परमसंतोष झाला; आणखी तितक्यांत, थीबन लोकांस जय प्राप्त झाल्याचें वर्तमान त्याच्या कानीं पडलें; तेणेंकरून तर त्याला परमाल्हाद झाला. त्याचा हर्ष त्रैलोक्यांत मावेना. तो जवळच्या लोकांकडे वळून, आनंदमुद्रेनें ह्मणाला, "माझ्या मित्रांनो, आजचा हा दिवस माझा शेवटचा दिवस आहे असें तुह्मी समजूं नका; तर, माझ्या सुखाचा हा पहिला दिवस आहे असें समजा. आज माझे सगळे मनोरथ परिपूर्ण झाले आहेत. माझ्या वैभवाचा कळस झाला आहे. माझा देश जयवंत झाला आहे, गर्विष्ठ स्पार्टन लोकांचें नाक कापलें आहे, आणि ग्रीस देश दास्यमुक्त झालेला आहे, असें दृष्टीनें पाहून मी परलोकीं प्रयाण करीत आहें. आनंद आहे." असें ह्मटल्यावर, भाल्याचें फळ त्यानें आपल्या हातानें आपल्या उरांतून काढिलें, आणि, तिळमात्रही कष्टी न होतां, एकाद्या महासाधूप्रमाणें प्राण सोडिला.

## " त्या तेजापुढें आमचें कांहीं चालायाचें नाहीं. "

अमेरिकन लोक गरीब होते; त्यांजपाशीं शस्त्रास्त्रें नव्हतीं; पण, त्यांचा निश्चय बळकट होता; त्याच्या योगानें त्यांची कार्यसिद्धि झाली. त्यांच्यामध्यें जनरल मारिअन ह्मणून एक सरदार होता. त्याजपाशीं, कांहीं विशेष अगत्याचें बोलणें लावण्याकरितां, एका सरदारास, जार्जटाउन येथून इंग्लिश लोकांनीं पाठविलें होतें. तें बोलणेंबिलणें आटोपल्यावर त्या सरदारास मारिअन ह्यानें आपले पंक्तीस जेवायास राहून घेतलें. तेव्हां आचाऱ्यांनीं, झाडांच्या सालींवर कांहीं बटाट्यांच्या फोडी मात्र आणून वाढिल्या. नंतर त्यास मारिअन ह्मणाला, " बसावें आतां " तें ऐकून, त्यास त्या इंग्लिश सरदारानें विचारिलें, "हें तुमचें खाणें नेहमीं असेंच असतें का ? " त्यास मारिअन ह्यानें उत्तर दिलें, " असेंच ह्मणून काय विचारितां ? आज इतकें तरी मिळालें आहे, हें मोठें भाग्य आहे. " तो इंग्लिश सरदार परत जार्जटौन येथें येऊन तेथल्या इंग्लिश लोकांस सगळें वर्तमान सांगून ह्मणाला, " आमचे लोक पुष्कळच आहेत, तेव्हां आपण अमेरिकनांचा पराभव करूं ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. परंतु, त्यांच्यामध्यें जें कांहीं तेज माझ्या दृष्टीस पडलें, तें अगदीं विलक्षण आहे. त्या तेजापुढें आपलें चालावयाचें नाहीं. आपण कदाचित कांहीं वेळपर्यंत त्यांना जिंकूं; पण, त्यांस सदोदित आपल्या स्वाधीन ठेवणें हें आमच्यानें कधीं व्हावयाचें नाहीं. "

---

## खरमरीत प्रार्थना.

इंग्लंडाशीं लढतांना, अमेरिकेंतल्या संस्थानांस पैशाची फार गरज लागल्यामुळें त्यांनीं कर्नल जान लारेन्स ह्यास बरीच रकम उसनवार मागण्याकरितां, फ्रान्साच्या दरबारीं पाठविलें. तेथें त्याचा आदरसत्कार यथास्थित झाला, परंतु, ज्या कामाकरितां

तो तेथें आला होता, त्याचा निकाल कांहींच लागेना. मुख्य प्रधान गोडगोड बोले, पण स्पष्ट उत्तर कांहींच देईना. आणि त्याला तर अमेरिकेहून एकामागून एक निकडीचे निरोप येऊं लागले. तेव्हां एक विलक्षण योजना त्यानें मनांत आणिली; आणि ती तेथल्या दरबारांतला त्या संस्थानांच्या वतीचा वकील बेंजामिन फ्रांकलिन ह्यास सांगितली. ती त्याला फार उद्धटपणाची वाटली, ह्मणून ती न करण्याविषयीं त्यानें त्याला पुष्कळ आग्रह केला. परंतु, तो सगळा व्यर्थ गेला. त्यानें ती करून आपलें कार्य साधलें. त्याचा प्रकार असा. राजानें दरबार भरून सर्वांच्या भेटी घेतल्या. त्यांत कर्नल जान लारेन्स हाही होता. तो, सलाम करण्याच्या अगोदर एकदम राजाच्या जवळ गेला, आणि खिशांतून एक कागद काढून त्यानें तो त्याच्या हातीं दिला. त्यांत त्यानें असें लिहिलें होतें कीं, "जी प्रार्थना मीं केली आहे, ती जर मान्य झाली नाहीं, किंवा ती मान्य करण्यास उशीर झाला, तर जी ही तरवार माझ्या कमरेला लटकली आहे, तिचा उपयोग आमच्या संस्थानांच्या स्वातंत्र्याच्या संरक्षणार्थ करावयाचा एकीकडे ठेवून, मी इंग्लंडांतल्या प्रजेंतला एक मनुष्य आहें, ह्या नात्यानें फ्रान्साच्या राज्याची खोड मोडण्यांत तिचा उपयोग करावा लागेल." हें लिहिणें खरोखर मोठ्या धाडसाचें होतें. पण, त्याचा लागलाच गुण आला. फ्रान्सानें अमेरिकेंतल्या संस्थानांस मोठी रकम उसनी दिली.

---

## "हानि सोसायास मी तयार आहें."

इ० स० १७७५ ह्या वर्षी अमेरिकन लोकांनीं बास्टन शहरास वेढा घातला. त्या अमेरिकनांमध्यें कांहीं लोक असे होते कीं, त्यांची सगळी मालमत्ता बास्टनांत होती. तें शहर साधारण उपायांनीं हातीं येत नाहीं असें पाहून, त्यावर तोफा लाव्या किंवा त्यांतल्या इमारतींस आग लावावी, असा विचार

निघाला. त्याची वाटाघाट चालली असतां, त्या मंडळीमध्यें जान हानाक ह्मणून एक मोठा श्रीमान व्यापारी तेथें होता; त्याची लाखों रुपयांची जिनगी बास्टनांत होती, आणि, त्यास तोफा लाविल्या असतां, त्या सगळ्या जिनगीची राखरांगोळी होण्याची खातरी होती. ह्मणून, त्या वादामध्यें तो काय मत देतो, ह्याजकडे इतर सगळ्यांचें लक्ष लागलें होतें. परंतु, तो खरा स्वदेशाभिमानी होता. तो उभा राहून शांतपणें ह्मणाला, "माझी पुष्कळ जिनगी बास्टनांत आहे खरी. तरी, स्वदेशाच्या कामापुढें मला तिची मुळींच परवा वाटत नाहीं. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ जें आवश्यक असेल, तें तुह्मी बेलाशक करा; त्यास माझी पूर्ण संमति आहे. आणि त्याच्यापायीं माझी कितीही हानि झाली तरी, ती सोसायास मी तयार आहें." हा गृहस्थ चांगला शिकलेला होता; आणि प्रवासादिकांनीं त्याचें चित्त प्रशस्त झालेलें होतें. आणखी हा मोठा धैर्यवान होता. अमेरिकेंतल्या संस्थानांचें स्वातंत्र्य स्थापित केल्याचा जाहीरनामा प्रगट झाला, त्यावर अगदीं पहिली सही ह्याची आहे.

---

## द्रव्य नको; स्वदेशाभिमान पाहिजे.

अथेन्स शहर, मासिडोनियाचा राजा फिलिप ह्याचे मनांत घ्यावयाचें होतें. पण, अथेन्साच्या लोकांमध्यें कांहीं देशाभिमानी शूर पुरुष होते, त्यांच्यापुढें त्याचा कांहीं उपाय चालेना. त्या शूरपुरुषांमध्यें फोशन ह्मणून एक गृहस्थ प्रमुख होता. त्यास वश करून घेण्याकरितां, कांहीं लोक, मोठमोठ्या देणग्या बरोबर देऊन, त्या राजानें त्याजकडे पाठविले. ते पाहून फोशन ह्यानें त्यांस विचारिलें, "असे नजराणे मलाच कां तेवढे पाठविले? शहरांतल्या इतर लोकांस कां नाहीं पाठविले?" त्यावर त्या लो-

कांनीं त्यास उत्तर दिलें, "तुह्मीं आपल्या उत्तम वर्तनानें उत्तम लौकिक मिळविला आहे, तो फिलिप राजास कळला आहे; त्या लौकिकास योग्य अशा डामडौलानें तुमच्या मुलांस राहतां यावें ह्मणून ह्या देणग्या महाराजांनीं आपणांस दिल्या आहेत." त्यांस फोशन ह्मणाला, "त्या राजाच्या ह्या सगळ्या देणग्या फुकट गेल्या. जर माझीं मुलें माझ्यासारखीं असलीं, तर, तीं, आमच्या वडिलोपार्जित लहानशा जमीनजुमल्यावर आपला निर्वाह बेताबातानें करून, माझ्याप्रमाणें लौकिक मिळवितील. त्यांच्या संरक्षणार्थ ह्या लोभास गुंतून मी माझ्या जन्मभूमीशीं कधींही निमकहरामपणा करणार नाहीं."

पुढें, फिलिप राजाचा पराक्रमी पुत्र शिकंदरबादशहा ह्यानें-ही फोशन ह्यास वश करून घेण्याकरितां, त्याजकडे नजराणे पाठविले होते. ते ज्या वकिलांनीं आणिले होते, त्या वकिलांस तो स्वदेशभक्त पुरुष ह्मणला, "तुमच्या महाराजांस ह्मणावें, हे नजराणे मला नकोत. हे आपले परत घ्या. आणि त्यांना सांगा, तुह्मी मला जसा थोर आणि सद्गुणी समजतां, तसा मीं जन्मपर्यंत राहावें, ह्मणून तुह्मी मला असें एकादें कांहीं भलतेंच करण्यास मोह घालूं नका."

## स्वदेशहितार्थ जीवंत पुरून घेणें.

प्राचीनकाळीं उत्तर आफ्रिकेमध्यें कार्थेज आणि सैरीन हे प्रांत अगदीं जवळजवळ शिवशेजारी होते. आणि त्यांच्या सरहद्दी-विषयीं वाद पडला. त्याची बरोबर तोड निघेना; तेव्हां, त्या वेळच्या अडाणीपणाच्या समजुतीप्रमाणें, उभयपक्षांच्या मतानें असें ठरलें कीं, त्या दोन्ही प्रांतांच्या मुख्य शहरांतून, अगदीं एकाच वेळीं, दोन दोन गृहस्थ एकमेकांच्या शहराकडे जावयास निघावे; आणि, त्यांची गांठ मध्यें ज्या जागेवर पडेल, त्या

जागेवर उभयपक्षांच्या प्रांतांची सरहद्द समजून वांटणी करावी. त्याप्रमाणें दोहोंकडची मंडळी निघाल्यावर, बुद्ध्या जलद चालून ह्मणा कीं दुसऱ्या कोणत्या कारणानें ह्मणा, कार्थेजकडचे दोघे गृहस्थ, पुष्कळच पुढें आले, आणि त्यांनीं सैरीन येथील गृहस्थांस त्यांच्या शहरापासून फार थोडक्या अंतरावर गांठलें. तेव्हां, अर्थातच, कार्थेज संस्थानास पुष्कळ अधिक प्रदेश मिळण्याची वेळ आली, आणि सैरीन संस्थानाचें तितकें नुकसान होऊं लागलें. तेव्हां, सैरीनवाले, अतिशयित कोपायमान होऊन, नानाप्रकारचे कुतर्क काढून भांडावयास उठले. ते कोणतीच तोड ऐकेनांत. तरी शेवटीं त्यांनीं असें बोलणें लाविलें कीं, कार्थेजवाल्यांनीं त्याच पायीं परत आपले गांवीं जावें एक, किंवा, आपल्या कृतीच्या सत्यप्रदर्शनार्थ तेथच्यातेथें जीवंत पुरून घेण्यास कबूल व्हावें एक; तर ही सरहद्द आह्मांस मान्य आहे. ह्यांतल्या दुसऱ्या शर्तीस—ह्मणजे स्वतःस जीवंत पुरून घेण्यास ते उभयतां कार्थेजीनियन गृहस्थ कबूल झाले. ते दोघे भाऊभाऊ होते. त्यांच्या कुलाचें नांव फिलिनी असें होतें. त्या दोघां भावांस त्या ठिकाणीं जीवंत पुरिलें; तेव्हां तो तंटा मिटला. आणि त्याच्या योगानें कार्थेज संस्थानास पुष्कळ प्रांत मिळाला. त्यावरून कार्थेजीनियन लोक त्या दोघांस देवासारखें मानूं लागले.

## " मरा देखील. "

इंग्लिशलोक अमेरिकनांशीं लढत असतां, कर्नल टार्लिटन हा एक इंग्लिश सरदार, एका अमेरिकनाच्या येथें गेला, आणि अमेरिकनांचा मुख्य सरदार जार्ज वाशिंग्टन तो मी आहें असें ढोंग करून राहिला. त्या अमेरिकनास तें कपट समजलें नाहीं; आणि आपणाकडे फार मोठा पाहुणा आला आहे, त्याचा

त्याला मोठा हर्ष होऊन त्यानें त्याचा फार आदरसत्कार केला, आणि इंग्लिशांवर कसें चालून जावें वगैरे लढाईच्या संबंधानें आपल्या मनांतल्या सगळ्या गोष्टी त्यानें त्याला सांगितल्या. त्या सगळ्या हो हो ह्मणून त्यानें ऐकून घेतल्या. आणखी निघते-वेळेस घरधन्यास ह्मणाला कीं मोठ्या रस्त्याला मी लागेंपर्यंत मला वाट दाखविण्यास तुह्मी स्वत: मजबरोबर याल तर फार चांगलें होईल. त्याप्रमाणें तो त्याच्या बरोबर बोलतबोलत अ-गदीं त्या छावणीपर्यंत गेला. तेव्हां, कर्नल टार्लिटन ह्याच्या शि-पायांनीं लागलाच त्याला कैद करून बिड्या घालून ठेविलें. आणखी, तेथें दररोज अमेरिकन लोकांस फांशीं देत असत, तें पाहायास त्याला त्या ठिकाणीं नेत, आणि सांगत कीं, एके दिवशीं तुझी वाट अशीच व्हावयाची आहे, तयार राहा. त्यावर तो त्यांस निर्भयपणें असें उत्तर देई कीं, "मी आपल्या देशाच्या हितार्थ मरायास एका पायावर तयार आहें. पण, एक लक्षांत ठेवा कीं, मला जर तुह्मीं ठार मारिलें, तर, माझ्या पलट-णीमध्यें माझे जे पुष्कळ मित्र आहेत, ते, तुमचें उसनें सव्याज फेडल्याशिवाय कधीं राहाणार नाहींत." त्यावरून, त्यांनीं त्यास न मारतां कितीएक दिवसपर्यंत तसेंच कराग्रहांत ठेविलें होतें. तेथें त्याचे फार हाल झाले. त्याच्या पायांस बिड्यांचे घट्टे पडले होते, ते तो आपल्या मित्रांस दाखवून ह्मणत असे कीं, "अरे, तुमच्या देशाचें हित साधण्यास जर असे क्लेश सोसावे लागले, तर त्यांची परवा करूं नका; मरा देखील."

---

## स्वाभिमानापेक्षां स्वदेशाभिमान अधिक.

इराणदेशाचा बादशाहा थोरला झर्कसिज हा अफाट सैन्यासहव-र्तमान, ग्रीसदेशांतल्या थिसिली आणि बूशिआ ह्या प्रांतांतून, आ-टिकाप्रांतावर स्वारी करण्यास मोठ्या वेगानें येत आहे, असें अथेन्स

येथील लोकांस वाटलें, तेव्हां त्यांचे हात पाय गळून गेले, आणि त्यांना असें खचीत वाटलें कीं, आतां लवकरच आपला सर्वस्व नाश होणार. आणखी भरअमदानीच्या वेळीं त्यांनीं आप त्यांतल्याच ज्या लोकांस फार त्रासविलें होतें, त्यांजकडे पाहून त्यांना असें वाटलें कीं, शत्रु जवळ येतांच ही सगळी मंडळी जाऊन त्याला मिळेल, आणि ते सगळे एकदम आपणांवर पडतील. अशा प्रकारें त्यांच्या तोंडचें पाणी पळालें.

शिवाय दुसरें एक असें झालें होतें कीं, त्यांच्यामध्यें आरिस्टैडीज ह्मणून एक फार चांगला प्रामाणिक आणि स्वदेशाभिमानी गृहस्थ होता. त्याला सगळे लोक फार वाखाणीत, त्यावरून त्याचा मत्सर करून, त्याला, तेथल्या पुढाऱ्यांनीं, उगाच कांहीं तरी निमित्त लावून, देशपार केलें होतें. तो मोठा योद्धाही होता; आणि तो कदाचित आपल्या शत्रूस ह्मणजे झर्कसिज ह्यास जाऊन मिळून आपला सूड उगवील कीं काय; असा संशय त्यांच्या पोटांत आला होता. परंतु, तो व्यर्थ होता. आरिस्टैडीज हा तशा प्रकारचा पुरुष नव्हता. त्या लोकांनीं सूचना पाठविल्याबरोबर मोकळ्या मनानें आणि मोठ्या आनंदानें तो त्यांच्या मंडळींत परत आला; आणि, थेमिस्टोकलीज ह्या मुख्य सेनापतीच्या हाताखालीं राहून त्यानें अथेन्सकरांस स्वसंरक्षणाच्या कामीं अत्युत्तम प्रकारें साह्य केलें. ह्मणजे, त्या लोकांनीं त्याला जी पीडा निरर्थक दिली होती, ती मनांत न आणितां, स्वदेशाभिमानाकडे सगळें लक्ष देऊन, त्यानें आपलें कर्तव्य बजाविलें. ह्या संबंधानें अशी एक चमत्कारिक गोष्ट सांगतात कीं, त्या लोकांनीं त्याला प्रथम जेव्हां देशपार करायास बाहेर काढिलें, तेव्हां तो शांतपणें ह्मणाला, "देव करो, आरिस्टैडीज ह्याला परत बोलावून आणण्याचा प्रसंग अथेन्सकरांस कधींही न येवो." पण, तो आला.

## स्वीडन स्वतंत्र कसें झालें ?

डेन्मार्कांचा व नार्वेचा राजा दुसरा क्रिस्त्यन ह्यानें इ०स० १५२० ह्यावर्षी स्वीडनदेश जिंकून घेऊन, पादाक्रांत करून टाकिला; आणखी, तो असाच निरंतर आपल्या स्वाधीन राहावयाचा, स्वतंत्र व्हावयाचा नाहीं, अशा समजुतीवर, तेथील लोकांवर पाहिजे तसा जुलूम करून, कोपेनहेगेन येथें तो स्वस्थ ऐषआराम करीत राहात असे. तरी स्वीडनचे लोक त्याजवर अगदीं जळत होते, आणि त्याच्या जाचांतून सुटून जायास पाहात होते; परंतु, त्यांचा उपाय चालेना. त्या लोकांमध्यें गस्टाव्हास ह्या नांवाचा एक सरदार होता. त्याच्या बापाला, आईला, भावांला आणि बहिणींना, क्रिस्त्यन ह्यानें, हालहाल करून ठार मारून, त्याला स्वतःला कितीएक वर्षेंपर्यंत कोपेनहेगेनच्या कारागृहामध्यें कोंडून ठेविलें होतें. तेथें त्याला नानाप्रकारचे क्लेश भोगावे लागले. त्यांच्या योगानें त्याच्या सर्वांगावर घट्टे, चट्टे, आणि वण पडले होते. तो कांहीं दिवसांनीं, मोठ्या युक्तीनें त्या प्रतिबंधांतून सुटला, आणि परत स्वदेशीं स्वीडन येथें डोंगरांत जाऊन राहून, तेथें लोक जमवूं लागला. तो चांगला बोलका होता. त्यानें आपल्या देशाचा मागचा सगळा वृत्तांत आपल्या लोकांस सांगितला. आपलें वैभव केवढें होतें, त्याचें वर्णन त्यानें केलें; डेन्मार्कांच्या राजानें आपल्या राष्ट्राची कशी धूळधाणी केली ती त्यांच्या मनांत भरविली; आणखी, त्याच्या प्रमाणार्थ आपल्या आंगावरचे घट्टे, चट्टे आणि वण दाखवून, त्यांच्या मनांत, स्वदेशाभिमान असा कांहीं विलक्षण उत्पन्न केला कीं, ते सगळे लोक, एकजीव होऊन, त्याच्या अर्ध्या वचनांत राहण्यास तयार झाले. आणि त्यांस बरोबर घेऊन तो स्वीडनांतल्या डेन्मार्की लोकांवर एकाएकीं

तुटून पडला. तो इतका कीं, तो त्यांचा पाठपुरावा करीत कोपेनहेगेनपर्यंत गेला. तेथें उभयपक्षांचा तह होऊन, स्वीडनच्या गादीवर गस्टाव्हस ह्याची योजना झाली. हें वर्तमान १५२३ त घडलें. ह्याप्रमाणें, स्वीडनदेश परकीय लोकांच्या हातून सुटूत स्वतंत्र झाला. हें गस्टाव्हसाच्या आणि त्याच्या अनुयायांच्या निश्चयाचें फल होय.

---

## मरायाचें; पळायाचें नाहीं.

इ०स०१७९८ ह्या वर्षी स्वित्सर्लंडावर स्वारी करण्याकरितां फ्रान्साचें अवाढव्य सैन्य अगदीं सरहद्दीशीं येऊन थडकलें. तेव्हां तेथील लोक अगदीं गांगरून जाऊन, मानगार्टन ह्मणून जी एक मोठी टेंकडी तेथें आहे, तीवर जमा झाले, आणि पुढें करावयाचें काय ह्याचा विचार करूं लागले. त्यांस कांहीं सुचेना, इतक्यांत, आलायसरेडिंग ह्या नांवाचा त्यांचाच एक शूर सरदार पुढें आला, आणि त्यांस ह्मणाला, " मित्रहो, बांधवहो, प्रसंग तर येऊन ठेपला आहे. आपले मित्र आपणांस सोडून गेले आहेत, आणि शत्रु आपणांस वेढा घालून बसले आहेत. तर आतां, ह्याच टेंकडीवर, अशा आणीबाणीच्या वेळेस आपल्या वाडवडिलांनीं तरवारबहादुरकी गाजविली, तशी आपण गाजवायाची, किंवा दुसरा विचार करावयाचा, हें आतां ठरवायाचें आहे. मृत्यु तर डोळे वटारून आपणांसमोर उभा आहे. त्याचें भय ज्याला वाटत असेल, त्यानें बेलाशक येथून निघून जावें. त्याला आह्मी नांव ठेवणार नाहीं. अशा गंभीर प्रसंगीं एकमेकांच्या भिडेनें कोणतीही गोष्ट करणें हें बरें नाहीं. शत्रु आंगावर आल्याबरोबर स्वतः पळत सुटून दुसऱ्यांचा घोटाळा करणारे असे हजार लोक असल्यापेक्षां, दृढ निश्चयानें रणांगणीं उभे राहून लढणारे असे शंभर लोक बरे. स्वतः मजविषयीं ह्म-

णाल तर, केवढेंही संकट येवो—प्रत्यक्ष मृत्यु मजपुढें येऊन उभा राहो—मी मागें हटावयाचा नाहीं. मरेन, पण पाऊल मागें घेणार नाहीं. आणि तुमचा सर्वांचा निश्चय जर असा असला, तर, तुमच्यांतले कोणीतरी दोघे पुढारी होऊन येऊं द्या, आणि त्यांना ह्याप्रमाणें शपथा वाहूं द्या. " हें कानीं पडतांच, सगळ्या लोकांच्या अंतःकरणांत स्वदेशाभिमान अवतरला आणि ते एकदम मोठ्यानें ओरडून ह्मणाले, "महाराज, आह्मी तुह्मांस सोडून कदापि जाणार नाहीं. तुह्मी तेथें आह्मी." आणखी, अशाच निश्चयानें ते लढले. परंतु, त्या वेळीं त्यांचा पराभव झाला, आणि फ्रेंच लोकांनीं स्वित्सर्लंड देश जिंकून पादाक्रान्त करून टाकिला. तरी ह्या ज्या पुरुषांनीं मागें सरावयाचें नाहीं अशी शपथ घेतली होती, त्यांतला एक देखील मनुष्य फ्रेंचांच्या हातीं लागला नाहीं कीं त्यांचा दास झाला नाहीं. त्यांचा लौकीक अजूनपर्यंत स्वित्सर्लंडांत गाजत आहे.

---

## ह्मातारीचा स्वदेशाभिमान.

दक्षिण अमेरिकेंत व्हेनिझुएला ह्मणून एक देश आहे. त्याचा बराच भाग पूर्वी स्पेनाच्या ताब्यांत होता; आणि स्पानियार्ड लोक तेथल्या लोकांवर मनस्वी जुलूम करीत असत. त्यावरून, त्या देशांतून स्पानियार्ड लोकांची अजीबात उखाडबाजी करावयाची, असा निश्चय व्हेनिझुएलाची राजधानी काराकास येथील लोकांनीं केला. त्या कटांत, मांटिला नामक एका संपत्तिमान स्त्रीचे तीन मुलगे होते. ते तिघेही तेथल्या लष्करांत चाकरीस होते. त्यांना जसा स्पानियार्डांचा तिरस्कार आला होता, तसा त्यांच्या मातुश्रीसही त्यांचा तिरस्कार आला होता. आणि तीं सगळीं त्यांविषयीं नेहमीं चर्चा करीत असत. शेवटीं तिचा थोरला मुलगा, चाकरीस कंटाळून ती सोडून देऊन

घरीं बसला; दुसरा मुलगा, आपल्या लोकांस सोडून, स्पेनच्या सुभेदारास जाऊन मिळाला, आणि तिसरा, शत्रूच्या ह्मणजे स्पानियार्डांच्या हातीं सांपडल्यामुळें, त्यांनीं त्याच्या पायांत मोठमोठ्या बिड्या घालून त्याला कैदेंत ठेविलें. ह्या तिघांमध्यें मांटिलाबाईस दुसऱ्या मुलाच्या आचरणाचा मनस्वी राग आला; तो इतका कीं, तिनें, लागलेंच आपलें मृत्युपत्र लिहून त्यांत असें ठरवून ठेविलें कीं, तिच्या पश्चात् त्याला तिच्या द्रव्यांतली एक पैदेखील मिळू नये. आणखी त्याला असें सांगून पाठविलें कीं, तूं मला मेलास आणि मी तुला मेल्यें असें तूं समज. ह्यानंतर थोड्या वेळानें, स्पेनचा सुभेदार मांटिव्हर्डी ह्याचा अमल काराकास शहरावर बसला, आणि त्यास त्या बाईची ती सगळी हकीकत कळली. तेव्हां तो तिजकडे जाऊन तिला सांगूं लागला कीं, तूं आपलें मृत्युपत्र बदलून, आपल्या दुसऱ्या मुलास आपल्या दौलतीचा हिसा मिळे असें जर करशील, तर तुझा तिसरा मुलगा प्रतिबंधामध्यें अतिशयित कष्ट भोगित आहे, त्याची मुक्तता मी करीन. हें बोलणें त्या स्वदेशाभिमानी ह्यातारीला आवडलें नाहीं, त्याचा तिला मनस्वी राग आला, आणि ती त्या सुभेदारास ह्मणाली, "मी जें काय करून ठेविलें आहे, तेंच मला भूषणावह वाटत आहे. माझा दुसरा मुलगा, आपल्या आईचे अभिश्राप घेऊन नरकास जाईल; आणि तिसरा मुलगा स्वदेशाभिमानी आहे, तो पायांतल्या बिड्यांच्या कष्टांनीं जरी हालहाल होऊन मरण पावला, तरी मी त्याला ओंव्या गाईन, आणि तो स्वर्गास जाईल; त्याचा मला विशेष संतोष आहे. निमकहरामपणा करून, लज्जास्पद रीतीनें स्वातंत्र्यसुख मिळविण्यापेक्षां, स्वदेशाच्या हितार्थ, कष्ट सोसून मरणें हें फार श्रेयस्कर आहे." तें भाषण ऐकून त्या सुभेदारास मोठें नवल वाटलें. त्याला तिच्या स्वदेशाभिमानाचा थोडासा राग आला

खरा; परंतु तो सद्गुण होता. त्यास त्याच्यानें अपराध ह्मणवेना; तेव्हां, अर्थातच तिची प्रशंसा करणें त्याला भाग पडलें.

---

## स्वदेशाभिमानार्थ जिवावर उदार.

रोम शहर बांधल्यावर दोनशें शेचाळीस वर्षांनीं त्यास इत्रूरियन लोकांचा राजा पोर्सेना ह्यानें पुष्कळ सैन्यासहवर्तमान वेढा घातला. त्यांनीं शहर घेण्याकरितां आपली पराकाष्ठा करून पाहिली; परंतु कांहीं उपाय चालेना. आणखी, शहरामध्यें अन्न नाहींसें होऊन माणसें पटापट मरूं लागलीं. तेव्हां त्यांतल्या लोकांच्या पुढाऱ्यांची सभा भरली, आणि पुढें काय करावें, हा विचार तेथें निघाला. त्याचा वाद चालला असतां, म्यूशिअस सिव्होला ह्या नांवाचा कोणी एक रोमन गृहस्थ चटकर उभा राहून त्यांस ह्मणाला, "मी बाहेर शत्रूच्या लष्करांत एकटा जाऊन, कोणत्या तरी उपायानें पोर्सेना ह्याच्या तंबूंत रिघाव करून, त्याला ठार मारितों." तें त्याचें भाषण ऐकून सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें, आणि आनंदही झाला. त्याप्रमाणें त्यांचा निरोप घेऊन तो शूर पुरुष तेथून निघाला, तो, हळूच पोर्सेना ह्याच्या तंबूंत गेला. तों तेथें दोन माणसें त्याच्या दृष्टीस पडलीं. त्यांतला, जो मनुष्य अगदीं त्याला जवळ आढळला, तो, पोषाकाच्या वगैरे डामडौलावरून राजा असावासा त्याला वाटला; ह्मणून त्यानें त्याच्या पोटांत खंजीर खुपसून त्याला तेथच्या तेथें जमिनीवर पाडून ठार मारिलें. पण तो राजा नव्हता. तो चाकर होता; आणि दुसरा माणूस होता तो राजा होता. त्यानें धांवाधांव करून लागलेंच म्यूशिअस ह्यास पकडविलें, आणि चौकशी करण्याकरितां आपणासमोर आणविलें. त्याला कोण, काय, तूं हें कशाकरितां केलेंस असें विचारितां, तो स्पष्ट ह्मणाला, "मी एक रोमन गृहस्थ आहें,

मला म्यूशिअस ह्मणतात, मी तुमचा शत्रु आहें, आणि मी तुह्मांला खचीत ठार मारलें असतें. आणखी, तुह्मांस ठार मारण्यास जितकें धैर्य माझें आहे, तितकेंच धैर्य मरण सोसण्यास स्वतः मजमध्यें आहे." इतकें इकडे तो बोलत होता, इतक्यांत त्यानें, जवळच्या पेटलेल्या कुंडांत आपला हात खुपसला, आणि तो तेथें एखाद्या लांकडाप्रमाणें जळूं लागला तरी हूं कां चूं केलें नाहीं. तें पाहून त्या राजास विलक्षण आश्चर्य वाटलें, आणि त्यानें म्युशियसाला तेथून उचलवून दुसरीकडे ठेवविलें, आणि त्यास औषध पाणी देऊन बरा करून, मोकळें सोडून दिलें. नंतर, कांहीं वेळानें म्यूशिअस हा पोर्‌सेना ह्यास ह्मणाला, "खऱ्या सद्गुणाची योग्यता तुह्मांला कळावी ह्मणून मी तुह्मांला असें सांगतों कीं, माझ्यासारख्या आणखी तीनशें रोमन गृहस्थांनीं तुमचा जीव घेण्याचा विडा उचलिला आहे; तुह्मीं माझे कितीही हाल केले असतेत, तरी ही गोष्ट मीं तुह्मांला सांगितली नसती; पण माझा सन्मान मोठ्या औदार्यानें तुह्मीं केला आहे, ह्मणून त्या औदार्यगौरवार्थ मीं हें तुह्मांस सांगितलें आहे." तें कानीं पडल्यावर, मग रोमन लोकांच्या शौर्याच्या गौरवार्थ ह्मणा किंवा त्यांस भिऊन ह्मणा, त्या राजानें त्या शहराचा वेढा उठविला. तेव्हां अर्थातच, रोमन लोकांनीं म्यूशिअस ह्याचें मोठें देव्हारें केलें.

---

## "स्वातंत्र्य द्या नाहींतर मरण द्या."

इंग्लंडांतले इंग्लिश लोक अमेरिकेंत जाऊन राहिले. त्यांजवर राज्यकारभार इंग्लंडचें सरकार करीत असे. परंतु, इंग्लंडांतले लोक जसे पार्लमेंट सभेंत घेत असत, तसे अमेरिकेंतले लोक पार्लमेंट सभेंत घेत नसत. त्यामुळें असें होई कीं, इग्लंडाच्या लोकांनीं कायदे करावे, आणि ते अमेरिकेंतल्या लोकांनीं

निमूटपणें मानावे. हें मोठें लांछन आहे, केवळ भागुबाईपण आहे, असें अमेरिकेंतल्या लोकांस वाटून, आणि इग्लंड त्यांजवर नानाप्रकारचे कर बसवूं लागलें तें न आवडून, त्यांनीं इंग्लंडाशीं असें बोलणें लाविलें कीं, तुह्मी ज्यापक्षीं आह्मांवर कर बसवितां त्यापक्षीं आमचे लोक पार्लमेंटांत घ्या; किंवा कर बसवूं नका. पण, हें बोलणें इंग्लिश लोकांस रुचलें नाहीं आणि त्यांनीं अमेरिकन लोकांवर छापी कागदांचा कर आणि चाहाचा कर, असे नवे दोन कर बसविण्याचे कायदे केले. त्यावरून अमेरिकन लोकांच्या पायांची आग मस्तकास गेली. ते इंग्लंडाशीं भांडायास उभे राहिले. उभयपक्षांच्या लढाया इ० स० १७७५ पासून इ० स० १७८३ पर्यंत झाल्या; आणि शेवटीं अमेरिकन लोकांनीं इंग्लंडाच्या अधिकाराचें आपल्या मानेवरचें जूं झुगारून देऊन, आपलीं संस्थानें स्वतंत्र केलीं. त्या प्रकरणास नुकता आरंभ झाला होता; तेव्हां, इ०स० १७७४ ह्या वर्षी एके दिवशीं व्हर्जीनिया संस्थानाच्या प्रांतिक सभेमध्यें मंडळी अगदीं स्तब्ध बसली, आणि कोणी कांहीं बोलेना. तें पाहून, प्याट्रिक हेनरी, वकील, हा एक सभासद मोठा वक्ता होता, तो उठून ह्मणाला, “ एकमेकांचीं तोंडें पाहात बसण्याचा प्रसंग हा नव्हे. ह्या सभेंत जो विचार व्हावयाचा आहे, तो असा आहे कीं, त्यावर आपल्या सगळ्या राष्ट्राचें जीवित अवलंबून आहे. तो विचार ह्मणजे हाच कीं, **स्वतंत्र व्हा** किंवा **गुलाम होऊन रहा.** आपणास जर स्वतंत्र व्हावयाचें आहे, तर **आपणांस लढलें पाहिजे.** मी पुनः ह्मणतों कीं, महाराज, **आपणांस लढलें पाहिजे.** आपलें जें काय व्हावयाचें असेल, तें सगळें आपल्या शस्त्रास्त्रांच्या जोरावर आणि परमेश्वरी कृपेवर अवलंबून आहे. ह्या शिवाय दुसरा मार्ग नाहीं

ह्या प्रकरणांत कांहीं अर्थ नाहीं असें ह्मणणें हें व्यर्थ आहे. **स्वस्थता पाहिजे, स्वस्थता पाहिजे,** असें लोक ओरडतील मात्र; पण **स्वस्थता नाहीं.** युद्धास आरंभ होऊन चुकला आहे. आतां कोणत्या वेळेस काय वर्तमान येईल याचा नेम नाहीं. आपले देशबंधु समरांगणीं लढत आहेत; तर मग, आपण असें रिकामें कां बसावें ? आपल्या मनांत आहे तरी काय ? पायांत बिड्या घालून घ्याव्या आणि गुलाम होऊन बसावें, हें कशाकरितां, तर, जीव जगविण्याकरितां आणि स्वस्थता राखण्याकरितां ! तर मग ह्या जीवाची आणि त्या स्वस्थतेची किंमत एवढी मोठी आहे काय ? छिः ! छिः ! देव करो आणि अशा प्रकारचें जिणें आह्मांस कधीं गोड न लागो, आणि स्वस्थता कधीं न आवडो. लोक कांहीं करोत, पण, मी स्वतःविषयीं असें ह्मणतों कीं, मला स्वातंत्र्य द्या, नाहीं तर मरण द्या. ” ह्या पुरुषानें अमेरिकन संस्थानें स्वतंत्र झालेलीं पाहिलीं.

---

## राज्याधिकार नको; देशस्वातंत्र्य पाहिजे.

जिनोआ हें संस्थान स्वतंत्र असतां, फ्रान्सचा राजा पहिला फ्रान्सिस हा तें आपले स्वाधीन करून घेण्याच्या उद्योगास लागला. तें वर्तमान कानीं पडल्यावर, जिनोआ येथील एक सरदार डोरिआ ह्यानें त्या राजास एक पत्र लिहिलें. तें असें:– “ मनुष्यांचे व्यवहार सरळ रीतीनें चालविण्याकरितां जो अधिकार परमेश्वरानें दिलेला आहे, त्याचा उपयोग जर ते व्यवहार बिघडविण्याच्या कामीं कोणीं केला, तर तो असह्य होय. जिनोआ हें शहर आज कधींकाळापासून लिगूरियाची राजधानी आहे. ती महाराजांनीं नाहींशी केली, तर जनास काय वाटेल हें सांगवत नाहीं. महाराजांच्या कृतीनें आपली कशी हानि होणार आहे, हें आह्मां जिनोई लोकांच्या लक्षांत येऊन

चुकलें आहे. ह्याकरितां महाराजांनीं हा विचार सोडून द्यावा, आणि हलक्या लोकांच्या नादानें लहान मनोरथ सिद्धीस नेण्यास आपल्या कीर्तीची हानि करूं नये. ही आमची सर्वांची प्रार्थना आहे. आणखी मी महाराजांच्या लष्करांत ज्या मोठमोठ्या कामगिऱ्या केल्या आहेत, त्यांचें बक्षीस मला हेंच द्यावें. सरकाराला द्रव्याची अडचण असल्यास मला देणग्या सरकारांनीं दिल्या आहेत त्या सगळ्या मी परत सरकारास देऊन, शिवाय पन्नास लाख रुपये नजर करितों. ''

ह्या पत्राकडे त्या राजानें मुळींच लक्ष दिलें नाहीं, आणि जिनोआवर स्वारी करण्याची तयारी अधिकाधिक चालविली. तें पाहून, साल्होनाचा सुभेदार त्रिव्हुलसी ह्यास डोरिआ ह्यानें असें सांगितलें कीं " माझा आणि तुमच्या यजमानाचा ह्मणजे फ्रान्सच्या राजाचा स्नेह आहे खरा; पण, स्वदेशाच्या स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ मी त्यावर पाणी सोडण्यास तयार आहें. आणखी, आपल्या महाराजांस कळवा कीं, मी जो त्या पक्षास मिळालों आहें, तो द्रव्याच्या आशेनें मिळालों नाहीं. तर, आमच्या राष्ट्रानें तुमच्या महाराजांचें कांहीं एक केलें नसतां, त्यांनीं त्यावर शस्त्र धरलें आहे, आणि माझ्या विनंतीचा अव्हेर केला आहे, त्याच्या रागावर मीं हें कृत्य हातीं घेतलें आहे. ''

हा निरोप डोरिआ ह्यानें फ्रान्सिस ह्यास पाठविला, तेव्हां त्याला, स्वजीवरक्षणार्थ जिनोआ येथून पळून जाणें भाग पडलें. आणि फ्रेंचांनीं जिनोआवर आपला अमल बसविला. इकडे डोरिआ जो पळाला, तो जर्मनीचा बादशाहा पांचवा चार्लस ह्याच्या चाकरीस राहिला. आणि त्याच्या साह्यानें, त्यानें फ्रेंचलोकांस जिनोआंतून हांकून देऊन, तें पुनः पूर्ववत् स्वतंत्र केलें. तेव्हां अर्थातच तेथें पहिल्याप्रमाणें प्रजासत्ताक राज्य

स्थापित होऊन, तेथल्या लोकांनीं डोरिआ ह्यास आपल्या संस्थानाचा मुख्य केलें. तो त्या संस्थानाचा अगदीं स्वेच्छाचारी जुलमी देखील राजा सहज झाला असता. परंतु, ती गोष्ट त्याच्या मनांत देखील आली नाहीं. त्यानें, कांहीं वेळानें, तेथल्या मुख्यमुख्य लोकांस बोलावून आणून स्पष्ट सांगितलें कीं, " तुह्मांस जसें राज्य पाहिजे असेल, तसें राज्य करून घेण्यास तुह्मी मुखत्यार आहां. आतां हा राज्याधिकार मला नको आहे. हा मी आज सोडून दिला आहे. माझ्या सगळ्या श्रमांचें उत्तम बक्षीस मला हेंच पाहिजे कीं, आमचें हें संस्थान स्वतंत्र आहे, असें मीं पाहावें. मला राजा ह्मणून घेण्यापेक्षां शहरांतला संभावित गृहस्थ ह्मणून घेणें फार आवडतें. मला हा राज्याधिकार नको; आणि माझ्या बरोबरीच्या लोकांवर मीं अमल चालवावा, मीं त्यांजवर मोठेपण मिरवावें—हेंही मला नको. " अशा प्रकारें, राज्यसत्तेचा त्याग करून, आणि आपल्या संस्थानास स्वतंत्र–प्रजासत्ताक–करून, डोरिआ ह्यानें आआपलें नांव जगाच्या इतिहासांत अजरामर केलें आहे.

---

## " पूर्वजांच्या अस्थि देखील शत्रूंच्या हातीं लागूं द्यावयाच्या नाहींत."

अल्लीपाछा ह्याच्या राज्याच्या शेजारींच पार्गा ह्मणून एक लहानसें स्वतंत्र संस्थान होतें. तें आपल्या सत्तेखालीं आणावें अशी इच्छा अल्लीपाछा ह्यास झाली. आणखी, अल्लीपाछाचा व इंग्लिशसरकाराचा स्नेह होता. त्यावरून, तें संस्थान त्यास मिळवून देण्याविषयीं त्यांनीं प्रयत्न चालविला. परंतु, तो पाछा अतिशयित जुलमी, केवळ राक्षस होता, हें त्या संस्थानांतल्या लोकांस ठाऊक होतें. त्यामुळें तो विचार त्यांस केवळ विषासारखा वाटला. त्यांस स्वातंत्र्याचा उपभोग बरींच वर्षेंपर्यंत

मिळाला होता, आणि पाछाच्या ताब्यांत गेल्यावर त्या स्वातंत्र्याची मृत्तिका कशी व्हावयाची, हें त्यांच्या मनांत येऊन चुकलें होतें; त्यावरून त्यांनीं असा निश्चय केला कीं, कोणीं कांहीं सांगितलें तरी अल्लीपाछाच्या स्वाधीन असें व्हावयाचें नाहीं. परंतु, त्या कामीं इंग्लिशसरकारचा फार आग्रह होता, ह्मणून त्यांनीं असें ठरविलें कीं, पार्गायेथील ज्या लोकांस अल्लीपाछाच्या राज्यांत राहावयाचें नसेल त्यांनीं तें संस्थान सोडून पाहिजे तिकडे बाहेर जाऊन राहावें; आणि त्या संबंधानें त्यांचें जमीनजुमल्याचें वगैरे जें नुकसान होईल, त्याची रकम त्यांस द्यावी. त्याप्रमाणें, तें संस्थान सोडून बाहेर जाण्यास कोणकोण लोक तयार आहेत, त्यांची यादी करण्याकरितां, इंग्लिश कमिशनर तेथें आले. आणि ते पाहूं लागले तों, त्या संस्थानांतलें एकोनएक मनुष्य तेथून निघून जाण्यास तयार झालें आहे, असें त्यांस दिसून आलें. ते सगळे लोकच निघून जाण्यास सिद्ध होते असें नाहीं, तर, त्यांच्या पूर्वजांच्या ज्या अस्थि तेथें भूमिगत होत्या, त्या जाळून टाकायाच्या असा त्यांनीं निर्धार केला होता. ह्यांतला आशय एवढाच होता कीं, अल्लीपाछा आणि त्याचे बरोबरचे लोक ह्या चांडाळांच्या हातांचा विटाळ आपल्या वाडवडिलांच्या हाडांस देखील होऊं नये, अशी त्यांची इच्छा होती. हा प्रकार पाहून इंग्लिश कमिशनरांस विलक्षण आश्चर्य झालें; आणि ते, त्यासंबंधीं कांहींएक काम न करितां तसेच निघून गेले. शेवटीं, इ० स० १८१९ ह्या वर्षी अल्लीपाछा अगदीं बेतावर आला; आणि तें संस्थान कसें तरी स्वाधीन करण्याविषयीं त्यानें इंग्लिशसरकारास निकड लाविली. आणखी, शिवाय, त्या प्रांतावर स्वारी करण्यास त्यानें मोठें सैन्य तयार करून त्याच्या सरहद्दीपर्यंत आणिलें.

तें वर्तमान इंग्लिश कमिशनरांनीं पार्गा येथील लोकांस सांगितलें. त्याला ते भ्याले नाहींत, एवढेंच केवळ नव्हे; तर, त्यांस त्यांनीं असें साफ उत्तर दिलें कीं, आमच्यांतलें एकोनएक माणूस पार्गा येथून निघून जाण्याच्या आधीं जर अल्लीपाछाचे लोक आंत आले, तर, आधीं प्रथम आह्मी आपल्या हातांनीं आपल्या बायकामुलांचा संहार करूं, नंतर, वाडवडिलांचीं हाडें कबरींतून काढून तीं जाळून टाकूं, आणि, सगळी हकीगत सांगण्यास आमच्यांतला कोणी तरी एक अवशिष्ट राहीपर्यंत लढूं, हें खचीत समजावें.

अशा प्रकारें अत्यंत क्रोधायमान होऊन ते लोक जीवावर उदार झालेले पाहून, त्यांस शांततेच्या गोष्टी सांगून समजाविण्याकरितां इंग्लिशसरकारानें सर फ्रेडरिक आडाम ह्या सरदारास त्या संस्थानांत पाठविलें. तो पायींपायींच त्या शहरांत गेला. तेव्हां त्याच्या दृष्टीस असें पडलें कीं, प्रत्येक घराच्या पुढच्या दाराच्या बाहेर घरधनी, हातांत बंदूकतरवार घेऊन उभा आहे, आणि आपल्या प्राणांची हानि आतां इतक्यांत खचीत होणार अशा खातरीनें घरामध्यें बायकामुलें, अत्यंत चिताक्रांत होऊन रडत बसलीं आहेत. नंतर, तो शहरच्या चौकांत गेला. तेव्हां तेथें, आग लावून देण्यास अगदीं तयार केलेली, अशी त्यांच्या वाडवडिलांच्या हाडांची एक मोठी थोरली रास त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हां, त्या लोकांच्या दृढ निश्चयाविषयीं त्याची अगदीं खातरी झाली; आणि त्याच्या मनांत असें आलें कीं, असा भयंकर अनर्थ होऊं देणें हें अगदीं अप्रशस्त आहे. ह्मणून, तो लागलाच, अल्लीपाछाची छावणी जवळच सरहद्दीवर होती, तेथें त्याजकडे गेला, आणि कसें करा परंतु पुढें येऊं नका ह्मणून त्यानें त्यास विनंति केली. ती त्यानें

मान्य केली. पण तें लोकांस सांगायास तो पार्गीशहरांत येऊन पाहातो तों, त्या चौकांत मोठी थोरली राखेची रास पडली आहे, आणि सगळीं घरें ओस पडलीं आहेत, असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्याला पराकाष्ठेचें वाईट वाटलें.

## " तुह्मी तेथें आह्मी. "

इंग्लंडचा राजा तिसरा एडवर्ड ह्यानें फ्रान्सांतलें शहर क्याले ह्यास वेढा घातला. आणि त्यांतल्या लोकांस इतकें जेरीस आणिलें कीं, आंत खायास अन्न नाहींसें झालें, ह्मणून, ते, गवत, जमिनींतले किडे, आणि कातड्यांचे तुकडे, हीं शिजवून खाऊन निर्वाह करूं लागले. तेही पदार्थ त्यांस मिळेनातसे झाले, आणि मरायाची पाळी आली तेव्हां, त्यांचा मुख्य सुभेदार युस्टेस सेंट पायरी ह्यानें असा विचार केला कीं, आपल्या लोकांनीं जागच्या जागीं अन्नअन्न करून मरावें त्यापेक्षां दांतीं तृण धरून शत्रूंच्या स्वाधीन व्हावें हें बरें. आणि त्याप्रमाणें त्यानें लागलाच बाहेर निरोपही पाठविला. तो निरोप प्रथमतः एडवर्ड ह्यास अगदीं आवडला नाहीं. कां कीं, ते लोक विलक्षण धैर्याचे असल्यामुळें, त्यास तेथें दोन वर्षेपर्यंत वेढा घालून बसावें लागलें होतें. परंतु, ते फारच गायावाया करूं लागल्यावरून त्यानें त्या गोष्टीस रुकार दिला. तरी सूड उगविण्याकरितां त्यांतल्या त्यांत अशी एक अट घातली कीं, त्या शहरांतल्या लोकांपैकीं साहा शूर गृहस्थ, मुसक्या बांधलेले, असे माझ्या स्वाधीन करावे, आणि त्यांचें जें पाहिजे तें मी करीन. तें मागणें त्या लोकांस फार कठिण वाटलें. कां कीं, आपल्या रागाची शांति करण्याकरितां तो राजा त्या साहाजणांस अतिशयित हाल करून ठार मारील, हें ते जाणून होते. परंतु, तें मागणें कबूल केल्यावांचून शहराचा बचाव होईना. ह्मणून, त्याविषयीं विचार

करण्याकरितां, पायरी ह्यानें त्या सर्वांस आपणाजवळ बोलावून आणिलें, आणि त्यांस ह्मटलें, " माझ्या मित्रांनो, आणि देशबांधवांनो, आपली अवस्था काय झाली आहे, हें तुह्मांला ठाऊक आहे. तिजविषयीं मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. आतां, आपला क्रूर शत्रु जें विलक्षण मागणें मागत आहे, त्यास आपण मान्य व्हावें एक, किंवा आपलीं बायकामुलें त्याच्या स्वाधीन करून, त्यांचें जें काय तो करील तें निमूटपणें पाहून, अपमान सोसावा एक; ह्या दोहोंतून, कोणती तरी एक गोष्ट पतकरणें प्राप्त आहे. आपलें सर्वस्व घेऊन त्या अधमाचें समाधान होत नाहीं. तो आमच्या हातून जुलमानें महापाप करवायास पहात आहे; आणि त्याच्या योगानें आपणांस अत्यंत निंद्य, तुच्छ, अधमाधम, आपलें मुखावलोकन देखील कोणीं करूं नये, असें करावयाची इच्छा धरून तो बसला आहे. पण, अशा जिण्यांत काय अर्थ आहे? अशा प्रकारें जगून जगांत वागावें त्यापेक्षां मरावें हें बरें! तर आतां असे साहा असामी कोण ते लवकर निवडून काढा, आणि त्यांची रवानगी करा. आतां, ही तरी मोठी पंचाईत आहे. ती अशी. ह्या ज्या सगळ्या लोकांनीं, नानाप्रकारचे क्लेश सोसून—आपलें रक्तमांस खर्चीं घालून आणि हाडें झिजवून, ह्या शहराच्या ह्मणजे पर्यायेंकरून आपणां सर्वांच्या संरक्षणार्थ परिश्रम केले आहेत, त्यांतल्या कोणत्याही साहांना, अशा प्रकारें, हालहाल करून ठार मारण्याकरितां निवडून काढून, शत्रूच्या स्वाधीन करावें काय? ह्मणजे, ज्यांनीं तुमचें संरक्षण केलें, त्यांचा तुह्मीं वध करावा काय? न्याय, मनाचा थोरपणा, आणि भूतदया, हीं सगळीं एकवटून, अशा विचाराच्या आड येतात! फार काय सांगावें, ह्या विचारास तीं मनांत देखील येऊं देत नाहींत. आंगावर

रोमांच उभे राहातात. पोटांत कसेंसेंच होतें. पण करतां काय ? दुसरा कांहीं उपाय आहे काय ? दुर्लौकिक आणि अपमान टळावा, आणि आपल्या शहराचा विध्वंस होऊं नये, अशी युक्ति कोणाला सुचत आहे काय ? नाहीं. पण, माझ्या मित्रांनो, एक उपाय आहे. तो सफल होण्यास मनुष्य पाहिजे. तो असा पाहिजे कीं, त्याला मरण पतकरावें पण दुर्लौकिक पतकरूं नये. असा कोणी माणूस येथें आहे काय ? असेल, तर त्यानें पुढें यावें, आणि आपला जीव अर्पण करून आपल्या देशाचें रक्षण करावें. त्या मनुष्यास मोक्ष प्राप्त होईल, ह्यांत कांहीं संशय नाहीं. पाहा. ”

हें भाषण पायरी ह्यानें केलें, तेव्हां ते सगळे लोक चित्रासारखे तटस्थ बसले होते; आणखी, तें संपल्यावर, अगदीं स्तब्धपणें एकमेकांकडे पाहूं लागले. त्यांजकडे पाहून, किंचित कांहीं स्मरल्यासारखें करून, पायरी हा आपण थोडासा पुढें सरसावून ह्मणाला, “ अहाहा ! ही सोन्यासारखी नवस करूनही प्राप्त व्हावयाची नाहीं अशी संधि मीं स्वतः हातची कां घालवावी ? माझ्या देशबांधवांच्या संरक्षणार्थ मी स्वतः शत्रूंच्या स्वाधीन होण्यास तयार उभा आहें. आतां आणखी पांच पाहिजेत. ” तें ऐकल्यावर त्याचाच मुलगा अगदीं तरुण होता, तो पुढें येऊन ह्मणाला, “बाबा, चला मी तुमच्या बरोबर यायाला तयार आहें. त्यानें माझ्या जन्माचें सार्थक्य होईल.” त्यास पायरी जवळ घेऊन ह्मणाला, “ तर मग मी द्विगुणित भाग्यवान आहें. ठीक आहे. पण आणखी चौघे कोण ?” त्यानंतर आणखी चौघे त्या मंडळींतून बाहेर येऊन त्यांस मिळाले. असे ते साहा असामी, दांतीं तृण धरून, मरणाच्या निश्चयानें, स्वदेशाच्या रक्षणार्थ, इंग्लिशांच्या स्वाधीन झाले. तेव्हां क्यालेचा वेढा उठला, आ-

णखी चमत्कार असा झाला कीं, त्या साहा असामींची फार करुणा, फिलिपाराणीस ह्मणजे एडवर्ड राजाच्या बायकोस येऊन, तेही, मोठा गौरव पावून, परत स्वदेशीं आले.

---

## स्वदेशाभिमान आणि राष्ट्रस्वातंत्र्य.

स्वित्सर्लंड हें पूर्वी कितीएक वर्षेपर्यंत आस्त्रियाच्या ताब्यांत होतें. तेथील लोकांवर आस्त्रियाच्या राजाचे सुभेदार अमल चालवीत असत, आणि त्यांस मनस्वी त्रास देत असत. तो इतका कीं, स्वित्सर्लंडांतल्या लोकांस आस्त्रियन लोकांशीं शुद्ध गुलामाप्रमाणें वागावें लागत असे. इ० स० १३०७ ह्या वर्षी तेथें सुभेदारीच्या कामावर जेस्लर ह्मणून कोणी एक गृहस्थ होता. तो अतिशयित जुलमी असे. त्याला असें वाटे कीं, माझ्या कुत्र्याला जो मान आहे तो, मोठ्या स्विस गृहस्थासही नाहीं. आणखी जेस्लर ह्याच्या हाताखालचे कामदारही तसेच मोठ्या उर्मटपणानें वागत असत. एके वेळीं आलतार्फ शहराच्या बाजारामध्यें पुष्कळ गर्दी झाली असतां, आणि तेथें जुलमाविषयीं पुष्कळ गोष्टी चालल्या असतां, एक आस्त्रियन सरदार बरोबर कांहीं शिपाई घेऊन आला, आणि, स्विस लोकांतला आवेश मोडून टाकण्याकरितां त्यानें, एका भल्या मोठ्या उंच काठीवर जेस्लर ह्याची टोपी ठेवून, असा हुकूम फिरविला कीं, रस्त्यांतल्या सगळ्या जाणाऱ्यायेणाऱ्यांनीं त्या काठीच्या पायां पडलें पाहिजे; आणि जो पडणार नाहीं, त्याला शिक्षा होईल. त्याप्रमाणें सगळे लोक हूं चूं न करितां तिच्या पायां पडून जाऊं लागले. असें चाललें असतां, त्यांच्या मंडळीपैकीं एक भला मोठा धिप्पाड शेतकरी, साधा पोषाक केलेला, पुढें आला, आणि ती टोपी कोणाची ह्मणून त्या अमलदारास त्यानें विचारिलें. तेव्हां ती जेस्लराची आहे ह्मणून त्यानें त्याला सांगितलें,

आणखी असें ह्मटलें कीं, " तूं हिला नमस्कार केला पाहिजे." त्यास त्या शेतकऱ्यानें साफ सांगितलें कीं, " मी त्या टोपीच्या पायां कधींही पडणार नाहीं. आजपर्यंत जेस्लर ह्याचा मनस्वी जाच आह्मी सोशीत आलों आहों. पण, आतां ही एवढी मानहानि आमच्यानें सहन करवत नाहीं." आणखी तो लोकांकडे वळून त्यांस ह्मणाला, " लोकहो, तुह्मी एकाद्या जनावराप्रमाणें ह्या अपमानकारक आज्ञेस मान्य झालांत आं! छिः! तुमच्या जिण्यास धिक्कार असो! धिक्कार असो!" असें उत्तर देणारा टेल्ल ह्मणून एक मनुष्य होता.

इतका प्रकार बाजारांत झाल्यावर टेल्ल ह्यास लष्करी लोकांनीं पकडून, चौकशी करण्याकरितां जेस्लर ह्याच्या पुढें नेलें. तेथें टेल्ल ह्यानें, एक शब्दही खोटा न बोलतां, सगळी हकीकत त्यास सांगितली. ती ऐकतांच, जेस्लर ह्याच्या आंगाचा फार संताप झाला. आणि त्याच्या मनांत असें आलें कीं, टेल्ल ह्यास कांहींतरी विशेष क्रूरपणाची आणि निर्दयपणाची शिक्षा दिली पाहिजे. ह्मणून, थोडें थांबून, तो त्याला ह्मणाला, " अरे टेल्ला, तूं मोठा उत्तम तिरंदाज आहेस–तुझी बरोबरी करणारा दुसरा एक देखील माणूस सगळ्या देशांत नाहीं,–असें ह्मणतात. हें जर तूं खरें करून दाखविशील, तर तुझा जीव बचावेल. आणि त्याची प्रतीति मी समक्ष पाहीन. ती अशी. तुला मुलगा आहे. त्याच्या डोक्यावर मी एक लिंबू ठेवीन. तें तूं, मुलास ढका न लागतां, वरच्यावर तिरानें उडविलेंस, ह्मणजे तुझ्या केंसास देखील ढका लागावयाचा नाहीं. आणि ह्यांत जर कांहीं कमजास्त झालें, तर मात्र तुला ठार मारीन." त्याविषयीं त्याला काय सांगावें हें टेल्ल ह्याला सुचेना. परंतु, ना ह्मणण्याची कांहीं सोय नाहीं असें पाहून, तो स्वस्थ राहिला. नंतर

लागलेंच, जेस्लर ह्यानें त्याप्रमाणें भरबाजारांत सगळी तयारी केली, आणि टेल्ल ह्यास, हातांत धनुष्य बाण घेऊन, मध्यें उभें राहण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो सज्ज झाला. तेव्हां, भोंवतालच्या लोकांच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या, आणि ते सगळे, अंतःकरणपूर्वक, टेल्ल ह्यास साह्य करण्याविषयीं परमेश्वराचा धांवा करीत आहेत, असें दिसलें. आतां टेल्ल बाण सोडणार, तेव्हां ते हजारों लोक अगदीं चित्रासारखे स्तब्ध राहिले; आणि टेल्ल ह्याचा जो बाण निघाला तो, त्या मुलास धक्का न लावतां, चटकर, त्याच्या डोक्यावरच्या लिंबाचे दोन तुकडे करून, पार निघून गेला. तेव्हां, सर्व लोकांस परम आल्हाद झाला. पण, त्या जाग्यावरून निघून जातांना, टेल्ल ह्याच्या आंगरख्यांतून सटकर आणखी एक बाण खालीं पडला. तो कशाकरितां आणिला होता, ह्याची चौकशी करितां, त्यानें जेस्लर ह्याला साफ सांगितलें कीं, "हा बाण, अरे दुष्टा, तुजकरितां आणिला होता. माझा बाण जर माझ्या मुलाला लागता, तर तत्क्षणींच हा बाण मारून मीं तुझा प्राण घेतला असता." तें ऐकल्यावर, जेस्लर ह्यानें टेल्ल ह्यास धरून पुनः प्रतिबंधांत ठेविलें.

इतक्यांत, आस्त्रियन सरकारावर उठण्याचा कट स्विस लोकांत गुप्तपणें चालला होता, आणि त्याचा पुढारी टेल्ल होता. तो कट चांगला तयार झाला. हें सारें जेस्लर ह्यास कळलें. तेव्हां, टेल्ल ह्यास बरोबर घेऊन, तो, एका गलबतांत बसून एका दूरच्या एकीकडच्या ठिकाणाकडे चालला. ह्यांतला उद्देश एवढाच होता कीं, टेल्ल हा त्या कटकऱ्यांस मिळूं नये, आणि त्यांपासून आपणांस इजा होऊं नये. तें गलबत कांहीं अंतरावर गेल्यावर, अकस्मात वादळ उठून, तें अगदीं बुडण्याच्या बेतास

आलें. तेव्हां तेथें कोणी असें सांगितलें कीं, टेल्ल हा फार उत्तम नावाडी आहे, आणि तो जर मनावर घेईल, तर गलबताचा बचाव करील. तेव्हां जेस्लर ह्याच्या विनंतीवरून, त्यानें सुकाणू हातांत घेऊन, त्या वादळांतून तें गलबत पार पाडिलें. आणखी, तें तसेंच पुढें हांकीत हांकीत एका खडकाकडे चालविलें. तें तिकडे तो कशाला नेत आहे हें प्रथम कोणास कळलें नाहीं. परंतु, त्या खडकाजवळ तें लागतांच, तो त्यावर उडी मारून, पळून गेला, आणि आपल्या कटवाल्यांस जाऊन मिळाला. आणखी, पुढें त्या कटाचें मोठें बंड होऊन, बंडाचें राजबल होऊन, शेवटीं टेल्ल ह्यानें, जेस्लर ह्यास, कुस्नाट येथें ठार मारिलें, आणि नंतर थोडक्या वर्षांनीं, आस्त्रियन लोकांच्या दास्यांतून स्वित्सर्लंड देश मोकळा करून घेतला. अशा प्रकारें टेल्ल ह्याच्या उद्योगानें स्वित्सर्लंडास स्वातंत्र्य प्राप्त झालें. हें टेल्ल ह्याच्या स्वदेशाभिमानाचें फल होय.

---

## "आणखी पुष्कळ मारतों तर बरें झालें असतें."

स्काटलंडचा राजा तिसरा अलेक्झांडर मरण पावल्यानंतर, वारशाच्या हक्कानें इंग्लंडचा राजा पहिला एडवर्ड हाच स्काटलंडचा राजा झाला. स्काटलंडास स्वतःचा राजा होता, तेव्हां तेथल्या लोकांवर सरकारदेणें अगदीं थोडें होतें—किंवा मुळींच नव्हतें ह्मटलें तरी चालेल. परंतु, तो देश एडवर्डाच्या ताब्यांत येतांच, त्यानें त्यांवर पुष्कळ नवे कर बसविले, आणि त्या कामीं त्यास साह्य करण्यास ह्यू क्रेसिंगहाम ह्या नांवाचा एक मनुष्य मिळाला होता. त्यानें तर क्रूरपणाची आणि जुलुमाची अगदीं कमाल केली. त्या दुःखाचें निवारण करावें ह्मणून स्काच लोकांनीं इंग्लंडच्या दरबारीं पुष्कळ खटपट करून पाहिली. परंतु, कांहीं एक उपयोग झाला नाहीं. तेव्हां ते अ-

गर्दी अणीबाणीवर आले, आणि सरकार ज्यापक्षीं सामोप चारानें आपली दाद घेत नाहीं, त्यापक्षीं जबरदस्ती करून आपला हेतु सिद्धीस नेला पाहिजे, असें त्यांच्या मनांत आलें पण, त्या कृत्यास त्यांना कोणीतरी पुढारी पाहिजे होता. तो-ही लवकरच मिळाला. त्याचें नांव सर विलियम वालेस असें होतें. तो मनुष्य लहानपणापासूनच विलक्षण शूर, आणि स्व-देशाभिमानी होता. त्याच्या लहानपणाची अशी गोष्ट सांगतात कीं, तो एकेदिवशीं आयर गांवानजीक ऐरव्हिन नदीवर मासे धरीत असतां जवळून कांहीं इंग्लिश शिपाई चालले होते. ते त्या मुलाकडे पाहात सहज उभे राहिले; आणि त्याच्या टोप-लींत जे थोडेसे मासे जमले होते, ते सगळे मासे त्यांतला एक शिपाई एकदम घेऊन जाऊं लागला. त्यास त्यांतले अर्धे मासे देण्यास वालेस हा स्वसंतोषानें तयार झाला. पण, ते त्या शि-पायाला पुरेनात. ह्यावरून त्या दोघांची मोठी मारामार तेथें झाली. तींत, प्रथमतः वालेस ह्यानें त्या शिपायास आपल्या काठीचा एक टोला लगावून, लागलीच त्याच्या कमरेची तरवार काढून घे-तली, आणि, तितक्यांतल्या तितक्यांत, पांच चार शिपायांस ठार मारिलें. आणि आपण पळून गेला. परंतु, त्या वेळीं तो अजीबात सुटला. त्याचें कांहींएक झालें नाहीं. तरी, तो तो प्रांत सोडून दुसरीकडे जाऊन राहिला होता. तथापि त्याच्या म-नांत इंग्लिशांविषयींचा द्वेषाग्नि धुमत राहिला; आणि संधि सा-धल्यास त्यांचा सूड घ्यावयास मागेंपुढें पाहावयाचें नाहीं, असा त्याचा संकल्प झाला. पुढें कितीएक वर्षांनीं, स्काच लोकांवर इंग्लिश लोक मनस्वी जुलूम करूं लागल्यामुळें त्यांचीं मनें अगदीं खवळलीं होतीं, त्या सुमारास एके दिवशीं हा गृहस्थ, ल्यानार्क येथील चौकांत, छानदार आंगरखा घालून

कमरेला एक उत्तम तरवार लटकावून, मोठ्या थाटानें फिरत असतां, कोणा एका इंग्लिश शिपायानें, उगाचेउगाच, त्याच्या जवळ जाऊन, त्याची कुचेष्टा मांडिली, आणि ह्मटलें कीं, "अरे, तुझ्यासारख्या माकडाला एवढा डौलदार आंगरखा कशाला पाहिजे? आणखी, जी तरवार हातांत घ्यायाला तुला थरथर भय वाटतें, ती तूं येथें उगाच लटकविलीस कशाला? रिकामें ओझें!" तरी, त्याजकडे लक्ष न देतां, वालेस तसाच निमूटपणें पुढें गेला. त्याच्या मागें तो शिपाई लागला. त्याची आणि ह्याची तेथें चांगली जुंपून, वालेस ह्यानें कितीएक शिपायी ठार केलें. नंतर तो तेथून पळून गेला, आणि आपल्या घरांत लपून राहिला. त्या घरास त्या शिपायांनीं वेढा घातला. तरी, त्याच्या मागच्या दारानें मोठ्या युक्तीनें तो निसटून गेला. तथापि त्याची बायको, अत्यंत सुस्वरूप आणि फार तरुण होती, ती तेथें राहिली. तिची त्याला वारंवार आठवण होई. परंतु, त्याला असें वाटे कीं, तिजकडे कांहीं अपराध नाहीं, आणि ती सुशील असून सुस्वरूप आहे, त्यापक्षीं तिच्या जिवास कोणी ढका लावणार नाहीं. परंतु, तो त्याचा अजमास चुकला. लानार्कचा सुभेदार हेसेलरिज ह्यानें, मोठ्या त्वेषानें तिचें तुकडे तुकडे करून तिला ठार मारिलें. हें वर्तमान, वालेस पळून जात असतां, त्याला कोणीं सांगितलें. तेव्हांपासून तर तो इंग्लिशांचा हाडवैरी होऊन राहिला. आणखी, जीं अपरिमित आणि भयंकर दुःखें स्काच लोकांस इंग्लिश लोकांच्या हातून होत होतीं, त्यांतून त्यांची सुटका करायाची, तेव्हां विश्रांति घ्यावयाची, असा त्यानें निश्चय केला. त्यानंतर लागलाच वर सांगितलेला प्रसंग प्राप्त होऊन, तो स्काच लोकांचा पुढारी झाला.

ह्याप्रमाणें स्काच लोक उठले, तेव्हां आयर प्रांताच्या इंग्लिश सुभेदारानें, त्यांतले मोठमोठे सरदार सल्ला करण्याच्या मिषानें, आपले येथें एके रात्रीं बोलाविले, आणि त्यांस विश्वासघात करून ठार मारिलें. आणि मग तो सुभेदार आपल्या हाताखालच्या कामदारांसहवर्तमान तेथें मोठा उत्सव करीत बसला. हें वालेस ह्यास कळतांच, आपले मित्र बरोबर घेऊन तो त्या वाड्याजवळ आला, त्यानें त्याचे दरवाजे एकदम बंद केले, आणि त्यास आग लाविली. हें त्यानें कांहीं चांगलें केलें नाहीं. कां कीं, इंग्लिश लोकांचा जो हा सूड त्यानें उगविला, तो विश्वासघातानें उगविला.

ह्यापुढें वालेस ह्याचें सैन्य बरेंच वाढलें. परंतु, त्यांत होळीचे होळकर पुष्कळ होते. इंग्लिशांचें सैन्य जवळजवळ येत आहे असें पाहून, त्यांतल्या कितीएकांनीं, हरव्हाइन येथें, इंग्लिश सरदारांशीं तह केला. त्याच्या योगानें त्यांच्या जीवांचें रक्षण झालें, पण त्यांची छीथू झाली; आणि त्यांच्या ठायीं पौरुष कसें तें मुळींच नव्हतें, असें दिसून आलें. तितके लोक वालेस ह्याच्या लष्करांतून कमी झाले, तरी तो डगला नाहीं. कां कीं, त्याच्या जिवास जीव देणारे असे कांहीं लोक त्याच्या बरोबर होते. त्यांचा तळ फोर्थनदीच्या उत्तरेकडच्या बाजूवर स्टर्लिंग येथें पडला होता. आणि त्याच्या समोर दुसऱ्या बाजूवर इंग्लिश सैन्याचा तळ पडला होता. त्या सैन्याचा अधिपति रेन हा होता. त्याला असें वाटलें कीं, स्काच सैन्य एवढेंसें आहे, त्याच्यानें आपल्या सैन्यापुढें पळभर देखील टिकाव धरवणार नाहीं. ह्मणून त्यानें दोन हलकाऱ्यांच्या द्वारें वालेस ह्यास सांगून पाठविलें कीं, तुह्मी सगळे आह्मांला शरण या, ह्मणजे आह्मी तुह्मांला जीवदान देतों. त्या हलकाऱ्यांस वालेस ह्यानें

ह्मटलें कीं, "इंग्लंडच्या राजानें आह्मांला जीवदान द्यावें, ह्यांत आह्मांला मोठी प्रतिष्ठा वाटत नाहीं. येथें आह्मी तुह्मांशीं तह करण्याकरितां येऊन बसलों नाहीं; तर, लढाई करून आमच्या देशास स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां बसलों आहों. इंग्लिशांना ह्मणावें, या, तुह्मी बेलाशक आह्मांवर चालून या, आह्मी तुमच्या दाढ्या उपटून हातावर देतों."

हा निरोप ऐकून इंग्लिशांस भारी त्वेष आला. आणि, त्यांनीं स्काच लोकांवर एकदम हल्ला केला; तेव्हां त्यांचा मुख्य सरदार क्रेसिंगहाम हा होता. त्या समरांगणामध्यें, स्काच लोक फार आवेशानें लढल्यामुळें, इंग्लिशांचा अगदीं पराभव झाला; आणि त्यांस, जीवरक्षणार्थ स्वदेशाकडे पळून जावें लागलें. अशा रीतीनें, स्काटलंड देश इंग्लिशांच्या जाचांतून सुटून स्वतंत्र झाला. आणि त्याचें प्रभुत्व वालेस ह्यास प्राप्त झालें.

पण ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. एडवर्ड राजानें स्काच लोकांशीं फालकर्क येथें मोठी लढाई करून, त्यांस जेरीस आणिलें. आणि पुनरपि स्काटलंड हें इंग्लंडाच्या स्वाधीन झालें. तरी वालेस हा, डोंगरांत लपून राहून, भटकतच होता. शेवटीं सर जान मांटीथ नामक एका स्काच मनुष्यानें विश्वासघातानें त्यास इंग्लिशांच्या हातीं दिलें. पुढें त्याची चौकशी झाली. त्या वेळीं त्याजवर राजद्रोहाचा आरोप ठेविला. त्यास त्यानें असें उत्तर दिलें कीं, "एडवर्ड हा कांहीं माझा राजा नव्हे, आणि मी त्याची प्रजा नव्हे; ह्मणून मी राजद्रोह केला असें होत नाहीं." नंतर, त्यानें पुष्कळ इंग्लिश लोकांचे खून केल्याचा आरोप त्याच्यावर ठेविला. त्यास त्यानें असें उत्तर दिलें कीं, "होय. मी पुष्कळ इंग्लिश लोकांस ठार मारिलें खरें; पण, तें एवढ्याचकरितां कीं, ते माझी जन्मभूमि स्काटलंड हीस जिंका-

यास आणि जाच करण्यास आले होते. त्यांना मीं मारिलें ह्याचा मला पश्चात्ताप होत नाहीं एवढेंच केवळ नव्हे, तर आणखी पुष्कळसे इंग्लिश लोक मीं ठार मारिले नाहींत, ह्याचें मला फार वाईट वाटतें." नंतर त्याचा शिरच्छेद झाला.

## "बहुमान शस्त्रास्त्रांत आहे."

कांहीं वर्षांपूर्वीं, ग्रीस देशांतला एक प्रांत आपले स्वाधीन करून घेण्याचा निश्चय तुर्क लोकांनीं केला. त्या प्रांताचें नांव सुली असें होतें. तेथले लोक तुर्कांच्या राजास मोजीत नसत. त्यांस जिंकण्याकरितां अल्लीपाछा ह्यानें त्या प्रांतावर स्वारी केली. तेव्हां त्या लोकांचा पुढारी झावेला हा होता. हे सुलियट लोक मोठे पाणीदार होते; आणि त्यांनीं पाछाच्या लष्करास दोन हात चांगले दाखविले. परंतु, त्याचें बळ फार मोठें असल्यामुळें त्यांच्यापुढें सुलियट लोक अगदीं टेंकीस आले; आणखी त्यांचा नाईक झावेला हाही त्यांच्या हातीं सांपडला. त्यास अल्लीपाछासमोर आणिलें. तेव्हां, त्यास वश करून घेण्याकारितां अल्लीपाछानें त्याचा पुष्कळ आदरसत्कार केला, त्याला पुष्कळ मोठमोठ्या देणग्या देऊं केल्या, आणि असें सांगितलें कीं सगळे सुलियट लोक शांतपणें जर आमच्या ताब्यांत येत असे कराल, तर, आमचे महाराज तुह्मांवर फारफार संतुष्ट होतील; पण, जर तुह्मी ह्या गोष्टीस मान्य न व्हाल, तर, तुमच्या आंगाचें कातडें सोलून काढून तुह्माला ठार मारूं; विचार करा. त्यावर, झावेला ह्यानें उत्तर दिलें कीं, "आधीं प्रथम मला मुक्त करा. कांकीं, मी जोंपर्यंत तुमच्या ताब्यांत आहें, तोंपर्यंत सुलियट लोक तुह्मांला कधींही वश व्हावयाचे नाहींत. मी त्या लोकांत जाऊन त्यांना समजून सांगतों, आणि त्यांचीं मनें वळविण्याचा प्रयत्न करितों. मग काय होईल तें होईल.

पण, ह्या कृत्यास तुह्मी मला प्रथम मोकळें सोडलें पाहिजे." त्यावर अलीनें त्यास विचारिलें कीं, "तूं परत आपल्या लोकांत गेल्यावर पुनः माघारा आमचेकडे येशील ह्मणून कशावरून?" यास झावेला हा, आपला मुलगा फोटो ह्याजकडे बोट करून ह्मणाला, "हा माझा मुलगा मी तुमचे येथें ओलीस ठेवितों. हा मुलगा स्वतः मला माझ्या प्राणाहीपेक्षां अधिक प्रिय आहे, आणि ह्याची किंमत, आमचे लोक, माझ्या हजारपट मानीत आहेत. हा तुमचेकडे असूं द्या."

त्याप्रप्रमाणें झावेला हा आपल्या सुलियट लोकांत गेला. तो त्यांस गाय होऊन अलीच्या अधिकारास मान्य होण्यास विनवीत बसला नाहीं. तर, त्यानें त्यांस असें सांगितलें कीं, सध्या तुह्मी लढतां आहां त्यापेक्षां अधिक नेटानें, मोठ्या जोरानें, आणि मोठ्या आवेशानें लढून तुह्मी आपलें रक्षण करा; कांहीं झालें तरी अलीच्या अधिकाराचा भार तुह्मी आपल्या डोक्यावर घेऊं नका. तेव्हां, त्यास कोणीं त्याच्या मुलाचें स्मरण दिलें, आणि त्याच्या जीवाचें काय होईल असें विचारिलें. तेव्हां स्वराष्ट्रास स्वातंत्र्य देण्याची उत्कट इच्छा आणि पुत्रप्रेम ह्यांचें तुमुल युद्ध त्याच्या अंतःकरणांत लागलें; आणि त्यांत त्या उत्कट इच्छेचा जय झाला. आणखी मग त्यानें आपल्या हातानें अलीपाछा ह्यास लिहिलें कीं, "अरे अलीपाछा, मी शेरास सव्वा शेर झालों, ह्याचा मला मोठा संतोष झाला आहे. मी जो इकडे आलों, तो, चोरांच्या हातून स्वदेश सोडवावा, ह्मणून आलों आहें. आतां माझा मुलगा प्राणास मुकला, हें मी समजून आहें. पण, मी मरण्याच्या आधीं त्याबद्दलचा सूड चांगला घेईन हें तूं खचीत समज. तुझ्यासारखे कांहीं लोक मला निर्दय पाषाणहृदय बाप ह्मणतील, आणि आपली स्वतःची

सुटका करून घेण्याकरितां, मुलाची मान मृत्यूच्या मुखीं दिली असें सांगत फिरतील. ते कांहीं ह्मणोत, आणि कांहीं सांगोत. पण, त्यावर मी उत्तर असें देतों कीं, तुह्मी जर आमचा प्रांत घेतला असता, तर माझ्या मुलाला, माझ्या कुटुंबाच्या इतर माणसांना, आणि माझ्या देशबांधवांस खचीत ठार मारिलें असतें. आणि तसें झालें असतें, ह्मणजे, माझ्या मुलास मारल्याचा सूड घेण्यास मला जागा राहिली नसती. आतां, आह्मांला जर जय मिळाला, तर मला आणखी मुलें होतील; आणि जर माझा मुलगा स्वदेशाच्या हिताच्या कामीं प्राण खरचण्यास सिद्ध झाला नाहीं, तर तो जीवंत आणि मेला सारखाच. तो माझा मुलगा ह्मणवून घेण्यास योग्य नाहीं. त्यानें मरावें हेंच बरें. तो जर धैर्य धरून मरायास सिद्ध नाहीं, तर त्याचें जन्म ग्रीसांत झालें आहे, हें अगदीं व्यर्थ आहे. तो खरोखर ग्रीसचा नव्हे. तर मग, ये आतां, निमकहरामा ये, तुझा सूड घेण्यास मी तयार आहें.''

पुढें अलीपाछा ह्यानें, इतर कैद्यांबरोबर, फोटो ह्यास राजधानीस पाठविलें. तेथें त्याला, मुख्य दिवाण इफेंडी ह्याचे समोर नेलें. तेव्हां, त्या मुलाचें अल्पवय आणि तेजस्वी मुख पाहून त्याला धमकावण्याकरितां असें ह्मटलें कीं, ‘‘अरे फोटो, तुझ्या बापानें फार हरामखोरी केली आहे, तीबद्दल तुला आतां आगींत घालून भाजून ठार मारितों पाहा.'' त्यास फोटो ह्यानें अगदीं न डगमगतां उत्तर दिलें, ‘‘महाराज, असें करूं नका. कां कीं माझ्या बापास जर जय प्राप्त झाला, आणि तुह्मी त्याच्या हातीं लागलां, तर तो हें तुमचें उसनें सव्याज फेडील, ह्यांत कांहीं भ्रांति नाहीं.'' तें ऐकून त्या दिवाणास आणि त्याच्या राजास मोठें नवल वाटलें. आणि त्यांनीं त्या मुलास ठार न मारितां एका बेटांत प्रतिबंधांत ठेविलें.

पुढें, तह करण्याच्या इराद्यानें, अल्लीपाछा ह्यानें आणखी चोवीस सुलियट लोक ओलीस मागितले. ते त्याच्या पुढें गेल्यावर त्यानें त्यांस सांगितलें कीं, तुमचे सगळे लोक आमच्या राज्याधिकारास जर मान्य होणार नाहींत, तर, आह्मी तुमचे हालहाल करून तुह्मांला ठार मारूं. त्यावर त्यांनीं त्यास साफ उत्तर दिलें, "अरे अल्लीपाछा, पाहा, अशा ह्या तुझ्या विश्वासघाताच्या वर्तनानें, तुझ्या कीर्तीस कलंक लागत आहे, आणि तुझ्या अधिकारास मान्य व्हावयाचें नाहीं असा जो आमचा निश्चय आहे, तो अधिकाधिक दृढ होत आहे. तुला माहीत आहेच कीं, आह्मी आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थ सत्रा जणांचे बळी दिले आहेत. त्यांच्याच जोडीला हे चोवीस जाऊं दे. ह्यांचें स्मरण ह्यांच्या देशबांधवांच्या अंतःकरणांत चिरकाल जागृत राहील; पण, त्यांच्याकरितां आमचें प्रजासत्ताक राज्य तुझ्या पायांखालीं येणार नाहीं. ह्यापुढें तुझा आणि आमचा तह कधीं व्हावयाचा नाहीं; आणि तो व्हावा अशी आमची इच्छाही नाहीं. ह्याचें कारण एवढेंच कीं, तुझें बोलण्यांत बोलणें नाहीं."

ह्यानंतर तो प्रांत पैसे देऊन विकत घ्यावा, असा विचार अल्लीपाछानें काढिला. त्यालाही ते लोक मान्य होईनात. तेव्हां, त्यांतल्या पुढारी लोकांस द्रव्य देऊन फोडून, आपलें कार्य साधावें, असें त्याच्या मनांत आलें. त्यावरून त्यानें, त्यांतला एक मोठा माणूस डीमोझव्ही ह्यांस कळविलें कीं, तुह्मी जर एवढी कामगिरी कराल, तर तुह्मांला आठ लक्ष रुपये रोख देऊन, शिवाय तुह्मांला फार उंच पदवीस चढवूं. त्यास त्या माणसानें लागलेंच उत्तर लिहिलें कीं, "वजीरसाहेब, आपण मजवर एवढी मेहेरबानी ठेवितां, हा मजवर मोठा उपकार आहे. पण,

आपणांस मी एवढीच विनंति करितों कीं, अशा द्रव्याच्य थैल्या मजकडे आपण पाठवूं नका; कां कीं, अशा प्रकारचा पैसा कसा मोजायाचा, हें मला ठाऊक नाहीं. आणि जरी तो कदाचित मोजितां आला असता, तरी, आपण हें खचीत लक्षांत ठेवा कीं, माझ्या सगळ्या राष्ट्राची गोष्ट तर क्षणभर एकीकडेस असो, पण माझ्या राष्ट्रांतल्या एका लहानशा गारगोटीची किंमत, आपल्या राज्यांतल्या सगळ्या संपत्तीच्या शंभरपट किंबहुना सहस्रपट आहे, असें आह्मी समजतों. तीच गोष्ट मानपानांस लागू आहे. सुलियट लोकांचा बहुमान काय तो शस्त्रास्त्रांत आहे. आणि शस्त्रास्त्रांनीं आपलें नांव अजरामर करून आपल्या राष्ट्राचें संरक्षण करावें, असा माझा कृतसंकल्प आहे."

[illegible]

## विक्रीस तयार.

### प्राकृत.

| | क्रि रु.आ. | ट.आ. |
|---|---|---|
| सावित्रीचरित्र. | ०-१ | ०॥ |
| धर्मराजद्रौपदीसंवाद. | ०-१॥ | ०॥ |
| शकुंतलाचरित्र. | ०-१ | ०॥ |
| श्रीज्ञानेश्वरचरित्र... | ०-१२ | २ |
| जन्माष्टमी ह्मणजे श्रीकृष्णजन्मकथा. | ०-२ | ०॥ |
| विचारसाधन. | ०-४ | ०॥ |
| विदुरवचन. | ०-१ | ०॥ |
| सुलभशाकुंतल. | ०-२॥ | ०॥ |
| मुलांचें कल्याण... | ०-१॥ | ०॥ |
| [illegible]युक्तदंपति प्रहसन. | ०-४ | ०॥ |
| [illegible]. | ०-३ | ०॥ |
| फुलांची परडी. | ०-४ | ०॥ |
| द्रौपदीहरण. | ०-१ | ०॥ |
| दिवाळी. | ०-१ | [illegible] |
| रामनवमी. | ०-१ | ०॥ |

### हिंदुस्थानी.

| | | |
|---|---|---|
| योगवासिष्ठ प्रकरणें ६ | १५-० | ८.२ |
| न्यायप्रकाश. | ७-० | १२ |
| योगवासिष्ठ प्रकरणें २ मुमुक्षु [illegible]वैराग्य... | ०-१४ | २ |
| [illegible] | ०-[illegible] | १ |
| आत्मबोध. | ०-४ | ०॥ |
| महावाक्यविवेक.... | ०-१ | ०॥ |
| नीलकंठशिवसंवाद. | ०-२ | ०॥ |
| हस्तामलकस्तोत्र. | ०-२ | ०॥ |

हीं पुस्तकें मुंबईत 'निर्णयसागर' छापखान्यांत विकत मिळतील.

स्वधर्मोन्नतिकरितां

# आर्यधर्म

आणि

# व्यवहार दर्पण.



हें पुस्तक

नारायण विनायक साठे आणि मंडळी.

यांनीं मुंबईत

"गोरक्षण" छापखान्यांत छापिलें.

सन १८९७ इ.

किंमत २ आणे.

श्रीगजानन.

# प्रस्तावना.

हल्लींच्या स्थितीला जिकडे पहावें तिकडे लोकांचे चाली रितींत फेर पडून धर्मसंबंधीं ग्रंथ पाहण्यास त्यांचें मन मुळींच धजावत नाहीं त्याजमुळें त्यांना आपल्या धर्माची अभिरुचि न लागतां दुसऱ्याच्या भलत्याच चाली रिती स्विकारतात; पण आपल्या धर्मसंबंधाच्या माहितीनेंच इहपरलोकीं आमचें कल्याण होणार आहे हा उद्देश त्यांचे मुळींच मनांत वागत नाहीं, व असे विषय लोकांचे नजरेसमोर आणून देणारे लोक थोडे आढळतात. दिवसेदिवस अशी स्थिती होत गेल्यास कालेंकरून त्याचा काय परिणाम होईल ? आमचे धर्माचा आह्मांस अभिमान नसावा यासारखें खेदयुक्त दुसरें कांहींच नाहीं; ह्मणून या विषयावर व सांप्रतची भरत खंडाच्या स्थितींची माझ्या अल्पमतीनें (आर्यधर्म व व्यवहारदर्पण) नांवांचीं लहान लहान पुस्तकें लिहून त्याचा होतां होईल तेवढा देशबांधवांच्या नजरेपुढें प्रसार करावा व लिहितां वाचतां येणाऱ्या प्रत्येक मनुष्याचे वाचण्यांत हीं लहानशीं पुस्तकें यावीं अशी बरी वाईट सेवा रसिक वाचकांस मान्य होवो इतकेच मागणें आहे.

# आर्यधर्म
## आणि
# व्यवहार दर्पण.

॥ सजयति सिंधुरवदनो देवो यत्पादपंकजस्मरणम् ॥
॥ वासरमणि रिवतसां राशिन्नाशयति विघ्नानां ॥

प्राचीन काळापासून आपल्या हिंदु लोकांची स्वधर्मावर श्रद्धा कशी होती? आपल्यावर परमेश्वराची कृपा असावी असें प्रत्येक मनुष्यास वाटत असतें. कारण या सर्व जगाचा शास्ता व पालनकर्ता परमेश्वर असल्याकारणानें आपणास इहपरलोकीं जो कांहीं सुखलाभ व्हावयाचा तो त्याची आपणावर कृपा असल्यावांचून खचित होणार नाहीं, तेव्हां आपण त्याची कृपा संपादन केली पाहिजे, पण ती कोणत्या उपायानें आपणास प्राप्त होणार? आमच्या धर्मांत सांगितल्याप्रमाणें वागणारे आज मितीस किती आहेत याचा विचार केल्यास शेंकडा पंचवीस निघण्याची मारामार पडेल. सर्व लोक इहलोकींच्या क्षणिक सुखास भुलून परलोकींच्या निरंतर सुखास मुकण्यास प्राप्त होत चालले आहेत. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार आपल्या देशांत जास्त जाहल्यामुळें लोकांस त्याची रुची जास्त लागून आपल्या रितीभातीचा लोप होऊं लागला आहे. बहुतेकांनीं तर त्यांचे रिवाजाचे कपडे, त्यांच्या रितीभाती यांचा पर जणूं काय त्यांनीं स्विकारच

गिरवून सोडला आहे. तोंडानें आह्मी हिंदु आहोंत असें ह्मणणारे हजारों सांपडतात; पण आपल्या धर्माचें खरें तत्व यांस माहित नसतें. ईश्वराविषीं खरी माहिती व आमची इहलोकींचीं कर्तव्यें जास्त विस्तारानें लिहिलीं आहेत असे आमचे धर्मग्रंथ वाचणारे व त्याप्रमाणें वागणारे आज मितीस किती सांपडतील! तर हा सांप्रतचा शिक्षण प्रभाव नव्हे काय?

॥ उत्पत्तिरेव विप्रस्य मूर्ति धर्मस्य शाश्वती ॥

आमच्या ब्राह्मणाची उत्पत्ति जी आहे ती निश्चयें करून धर्माची शाश्वत मूर्ति.

॥ शमोदमस्तपः शौचंक्षांतिरार्जवमेवच ॥
॥ ज्ञानविज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्मस्वभावजं ॥

हे आमचे स्वाभाविकच श्रेष्ठ गुण असून दुसरे अधिकार पाहिल्या अंतीं

॥ देवाधीनं जगत सर्वं मंत्राधीनंच दैवतं ॥
॥ ते मंत्रा ब्राह्मणाधीनाब्राह्मणो मम दैवतं ॥

पाऊस पडण्याचें, आणि वारा सुटण्याचें, शत्रूस मारण्याचें इत्यादि मंत्र[illegible] जाणारे गेतले आहेत व ते सर्व मंत्र आतां जरी [illegible]दतों आणि आम[illegible] पाहून चालल्यास त्याच्या योगें[illegible] आहिंसक हिंदु आहेत [illegible] आह्मांस करितां येईल पण [illegible]. तर या दोघांनां निःपक्ष[illegible] आहे?

ईश्वरा[illegible] अमृता सारखें जीवंत आहों तों[illegible]मता, त्यानें आमच्या[illegible] दुधाचे पेढे, बासुंदी व तूप करून [illegible]चे मनांत वागतात [illegible]आरोग्य व बलवान होऊन सुख भोगतात [illegible] नाहीं. हल्लीं ज[illegible]ल आहेत ते नांगर व गाड्या व अनेक [illegible] असें ह्मणून [illegible] व पावसांतून रात्रंदिवस ओढून सर्व मनु[illegible]

प्राचीनकाळापासून आपल्या हिंदु लोकांची स्वधर्म-श्रद्धा दृढ असल्याचें जगप्रसिद्ध आहे. पृथ्वींतील इतर लोक ज्यावेळीं केवळ रानटी स्थितींत होते त्यावेळीं या देशांतील लोक सुशिक्षित असून धार्मिकही होते. या देशांत धर्मसंबंधीं पुष्कळ बखेडेही झाले; परंतु वेदोक्त धर्म खरा अशी लोकांची पक्की खात्री होऊन त्या धर्मासच अनुसरून आमचे लोक वागत आले.

॥ स्वधर्मेनिधनं श्रेयः परधर्मो भयावहा ॥

पण इकडे कोणाचें लक्ष आहे ? मनुष्याची स्वधर्मावर श्रद्धा असली ह्मणजे त्याचे हातून सहसा वाईट कृत्य (पाप) होणार नाहीं. स्वधर्मश्रद्धा नसल्यानें मनुष्य ईश्वरासंबंधीं बेपरवा असतो. आपल्या पापाचरणाबद्दल ईश्वर आपणास शिक्षा कारितो हें भय त्याचे मनांत वागत नाहीं यामुळें दिवसेंदिवस त्याची पापाचरणाकडे प्रवृत्ति जास्त होते. विश्वासघात करणें, खोटी साक्ष देणें, मद्य पिणें, जार कर्म करणें इत्यादि पापांत ते नेहमीं चूर होऊन गेले व जात आहेत. आमच्या पूर्वजांच्या गोष्टी ऐकाव्या तर ते किती प्रमा एकवचनी व सदा-
चरणी होते. याविष ार केल्यास श्चर्य व अभिमान
वाटतो. त्यांसारखे डेल. सर्व लोक इह ी शक्य नाहीं
काय ? शक्य लोकींच्या निरंतर सुखासे . पहा अ-
कबर बादश ले आहेत. इंग्रजी शिक्ष ोवध कसा
बंद केला ांत जास्त जाहल्यामुळें लोकांस त्य हों: —
अक न आपल्या रितीभातीचा लोप ह क जागा
राजव बहुतेकांनीं तर त्यांचे रिवाजाचे कप करण्या-
करि माती यांचा तर जणूं काय त्यांनीं किता चमत्कार

झाला कीं, एक गाय घंटाकचेरींत जाऊन तेथील घांटेची दोरी आपल्या शिंगांत धरून मोठ्या जोरानें ती घांट वाजवीत तेथें उभी राहिली. घांटेचा नाद बादशहानें व बिर्बलानें ऐकल्याबरोबर मोठ्या त्वरेनें दोघेही तेथें आले आणि तेथें पाहूं लागले तो तेथें कोणीच मनुष्य नाहीं परंतु एक गाय तेथील घंटा वाजवीत उभी आहे तिला पाहून, बादशहा ह्मणतो, तुझा काय अर्ज आहे तो मला सांग. तें ऐकून गाय आपला अर्ज बादशहाच्या पुण्यप्रतापानें मनुष्य वाणीनें बादशहास कळविते.

गाई ह्मणते, हे राजश्रेष्ठा बादशहा, तूं धर्मनीति, न्याय जाणत आहेस व दयाळूपणानें सर्व प्रजेचें पित्याप्रमाणें जर पालन करित आहेस तर या गरीब गाईला न्याय दे जरी आपल्या शत्रूनें मोठा अपराध केला आहे आणि तो जर एक क्षणभर दांतांत तृण (गवत) धरून आपणांस शरण आला आहे तर त्यास कोणी कधींही मारीत नाहीं. आणि आह्मीं गाई, ह्मशी वगैरे गरीब ढोरें नेहमीं रानांत जाऊन आपलीं पोटें गवतानेंच भरितों. इतकेंच नाहीं. तर आमची मान कापून आह्मांस खाणारे जे म्लेंछ यवन आहेत त्यांस आह्मीं कडु दूध देतों आणि आमची पूजा करून आह्मांस सुख देणारे जे अहिंसक हिंदु आहेत त्यांस गोड दूध देतों असेंही नाहीं. तर या दोघांनां निःपक्षपातबुद्धीनें अगदीं गरीबपणीं अमृता सारखें जीवंत आहों तोंपर्यंत दूध देतों आणि त्या दुधाचे पेढे, बासुंदी व तूप करून ते खातात, आणि आरोग्य व बलवान होऊन सुख भोगतात व आमचे पुत्र जे बैल आहेत ते नांगर व गाड्या व अनेक ओझीं उन्हांतून व पावसांतून रात्रंदिवस ओढून सर्व मनुष्यांस

सुख देतात, इतकेंच नाहीं तरीही आमचें चामडें पाय राखण्याकरितां जोडे करण्यास व देवालयांत नगारे वगैरे वाद्यें करण्यास उपयोगीं पडतें व आमचीं शिंगें, हाडें, केंस, गोरोचन व मळ, मूत्रही मनुष्यांचें स्वच्छतेस नेहमीं उपयोगीं पडतात, या.तव आमचे जीव सर्व मनुष्यांनीं हरएक प्रयत्नांनीं सुखी राखणें हा मनुष्यांचा खरा धर्म आहे. असें असतां म्लेंछ यवन आमच्या तरुणपणाच्या दिवसांतच आमचे बिनअपराधी गळे कापून अति दुःख देतात; हे न्यायी बादशाहा. आमचे जीव रक्षण कर किंवा आमचे जीव घेण्यायोग्य आमचे कोणते अपराध आहेत ते तरी सांग.

अकबर बादशहानें असा हा गाईचा अर्ज ऐकून "अय पाक परवरदिगार !! मैं न्यायी होकर बडा अन्याय रह गयाथा." असें बोलून अतिदुःखित झाला आणि मोठ्या गहिंवरानें रडूं लागला आणि ह्मणाला, हे जगन्माते गाई, हिंदुस्थानवासी लोकांचे जीव संरक्षण करणारी व आह्मी मरेपर्यंत अमृतासमान दूध देणारी हे माते, तूं मजवर व माझ्या रयतेवर महत् उपकार करून जीवदान दिलेंस तर हे माते मला क्षमा कर ! क्षमा कर !! असें बोलून दुःखाश्रू काढिले आणि क्षमा मागूं लागला, आणि आजपासून माझ्या राज्यांत गाईला कोणी मारील त्यास फांशीची शिक्षा देईन असा कायदा करून सर्व ठिकाणीं तो जाहिर केला. तशींच शिवाजी राजाची हिंदुधर्मावर कशी श्रद्धा होती ! त्यानें गोब्राह्मणावर भयंकर जुलुमामुळें त्यांचें प्रतिपालन व्हावें या उद्देशानें यवनाशीं भयंकर लढाया केल्या व ईश्वर कृपेनें त्यास यशही आलें. त्याचाच मुलगा संभाजी हा

किती पापाचरणी होता परंतु स्वधर्म राखण्याकरितां त्यानें मरण पतकरलें, व तसें यवन लोकांनीं ज्यावेळीं जुलमानें बाटविण्याचा उद्योग चालविला त्यावेळीं हजारों लोक आपला धर्म कायम ठेवण्याकरितां मृत्युमुखीं पडले व तसा जुलुम, तशी स्थिति आतां नसतांना हजारों लोक ख्रिस्ती जहाले, बहुतेकांस स्वधर्म तुच्छ वाटून ते केवळ नास्तिक बनले, हिंदुधर्मांतून बहकून गेलेल्या लोकांस कोणी शास्ता नसल्यामुळें त्यांची स्थिति दिवसेंदिवस वाईट होत आहे.

देशांत लोकांची एकी असणें लोक संपत्तिमान असणें धनधान्य याची समृद्धि असून क्लेशरहित आरोग्यशाली असणें हीं सर्व ईश्वरकृपेचींच लक्षणें आहेत. ज्या देशांत याचे विरुद्ध स्थिति असेल तेथील लोकांवर ईश्वरी कृपा नाहीं समजलें पाहिजे. प्रस्तुत आपल्या देशाची तीच स्थिति आहली. या देशांतील हल्लींचा भयंकर दुष्काळ मोठमोठ्या शहरांत चालू असलेल्या अनिवार्य तापाच्या साथी, आवर्षण इत्यादि गोष्टींनीं आह्मांवरील ईश्वरी अवकृपा स्पष्ट दिसत आहे ह्मणून हिंदु प्रसारक मंडळी हिंदु मुसलमान, ख्रिस्ती वगैरे सर्व धर्मांतील लोकांस विनयपूर्वक प्रार्थना कारितों कीं पापाचरण सोडून स्वधर्मानें वागा आणि निर्मल अंतःकरणानें या संकटांतून रक्षण करण्याविषयीं ईश्वराची प्रार्थना करा. दाद लागतां लागतां लागेलच.

असो आतां आपल्या देशाची स्थिति कशी सुधारावी याचा आपण विचार करूं.

॥ नात्मानमवमन्येत पुर्वाभिर समृद्धिभिः ॥
॥ आमृत्योः श्रियमन्विच्छेन्नैनांमन्येत दुर्लभाम् ॥

प्रथमतः धनार्जनार्थ उद्योग करावा. पण जरी द्रव्य प्राप्त झालें नाहीं तरी उद्योग सोडून देऊन मी हतभागी आहे असें आपणच आपणास अवमान करून घेऊं नये. तर अमरण द्रव्य मिळण्यास उद्योग करावाच. संपत्ति दुर्लभ आहे असें कधींही मानूं नये. प्रथमतः देशांतील संपत्ति वाढविण्याचा मार्ग पाहिला पाहिजे. कारण. जसें मनुष्यास खाणें पिणें नीट असेल तसें त्यापासून दुसरे व्यवसाय होतात. त्या प्रमाणें देशांत ऐहिक सुखसाधन सर्व क्रियांचें अधिकरण धनधान्य बहुत असणं हें सुधारण्याचें मुख्य फळ होय. व आपला देश धनाढ्य असून परदेशात धन गेल्यामुळें भिकारी झाला हें सर्वत्र जाणतच आहेत तेव्हां अर्थात परदेशांत कशा करितां व कोणत्या मार्गानें द्रव्य जातें तें पाहून ते मार्ग बंद करणें अवश्य आहे. आपल्या देशांतील संपत्ति वाढण्याचा दुसरा मार्ग म्हटला म्हणजे, व्यापार संबधानें परदेशांत पैसा न जाऊं देणें राज्य संबंधापेक्षां व्यापाराच्या योगानें बाहेर संपत्ति फार जाऊन आपला देश भिकारी झाला आहे आजपर्यंत आपला देश भिकारी झाला असें म्हणत होते परंतु त्याचें खरें कारण आपणास चांगलें कळत नसें परंतु अलिकडे ना. दादाभाई नवरोजीसारख्या विद्वान गृहस्थाच्या श्रमानें व उद्योगानें देश कसा धुपत चालला आहे हें सर्वांस माहित झालें आहे. अमुक व्यापाराच्या संबंधानें अमुक कोटी द्रव्य जातें तमुक व्यापाराच्या संबंधानें तमुक कोटी द्रव्य जातें असें वाचलें म्हणजे देशाची भयंकर भावी स्थिति मनांत

येऊन फारच भय वाटतें व आजपर्यंत कित्येक लोक ह्मणत कीं मृन्मय पात्रीं व्यवहार व पितळेचे अलंकार कांहीं दिवसांनीं सुरू होतील यांत संशय नाहीं. ही गोष्ट आपणास मुर्तीमंत दिसूं लागली आहे. असुक कामाच्या संबंधानें असुक द्रव्य परदेशांत जातें वगैरे गोष्टी वर्तमान पत्रद्वारा बहुतेक देश बांधवांस ठाऊक झालेंच आहे व ज्यांस माहित नसतील त्यांनीं थोडा श्रम केला असतां सहज कळण्यासारखें आहे. याकरितां प्रत्येकांच्या रकमा सांगत बसून वाचकांचा अमोल्य वेळ खर्चीत नाहीं. सारांश इतकाच कीं जेणेंकरून आपल्या देशांतून व्यापारासंबंधानें पैसा परदेशांत जाणार नाहीं अशा तजवीजी करावयाच्या ह्या संबंधानें ही गोष्ट मुख्य ध्यानांत ठविली पाहिजे कीं आपल्या देशांतून कच्चा माल परदेशांत फार जातो ही गोष्ट फार तोटयाची आहे. उदाहरणार्थ कापूस घेऊं. आपला देश सुपीक असल्यामुळें देशास पुरून अधिक इतका कापूस तयार होतो, त्याचें कापड होऊन येथल्या येथें मिळालें तर देशाचा किती नफा होईल ? परंतु तसें न होतां येथून पांच[illegible] कोसावर कापूस नेण्याचा तेथल्या मजुरीच्या [illegible]दस्त महाग दराप्रमाणें कापड तयार करण्यास मजुरीचा व तेथून माल येथें घेण्याचा इतके खर्च आपणास फुकट पडतात. ह्या सर्व गोष्टी परकीय लोक करणारे असल्यामुळें तो सर्व नफा त्यांचे घरांत जातो. याप्रमाणें हजारों उदाहरणें दाखवितां येतील तसेच दुसऱ्या देशांतून माल येतो तो पक्का ह्मणजे तयार होऊन येतो त्यामुळें सर्व नफा त्यांसच मिळतो याकरितां देशस्थिति चांगली

राहण्यास देश-हितचिंतकांनीं या दोन गोष्टी ह्मणजे आपल्या देशांतून बाहेर कच्चा माल जाणें व बाहेरून पक्का माल येणें या जितक्या कमी होतील तितक्या कमी केल्या पाहिजे. आतां या गोष्टी बंद करण्यास मार्ग दोनच आहेत एक परदेशांतून आलेल्या मालाचा उपयोग न करणें अथवा सामान आपल्या देशांत उत्पन्न करणें आतां पहिली गोष्ट अवश्य आहे व ती आपणास होईल तितकी केली पाहिजे परंतु सर्वांशीं ती सिद्धीस जाणार नाहीं कारण मनुष्यास कोणताही पदार्थ माहित नसतो तोपर्यंत त्याविषयीं त्यास सुखदुःख कांहींच नसते पण एकवार पदार्थ मिळून त्याची चटक लागली ह्मणजे तो त्याच्यानें टाकवणार नाहीं. देश कल्याणार्थ आपल्या देशांत कच्चा माल खपविण्याकरितां थोडेसें तरी हाल कोठून सोसणार. या गोष्टी इंग्लिश लोकांनीच कराव्या. ईस्ट इंडिया कंपनी स्थापित होऊन जेव्हां हा हिंदुस्थानचा माल इंग्लंडांत फार खपु लागला त्या वेळेस इंग्लंडांत फारच गवगवा जाहला सर्वत्र लोक ह्मणू लागले कीं, यन पणें हिंदुस्थानांत पैसा गेला तर इंग्लंड देश भिकारी होईल. कितीएक पाद्री लोकांनीं हिंदुस्थानचा माल वापरील त्यास बहीष्कर घालावा असे सुद्धां ठरविले या गोष्टीमुळें इंग्लिशाचा फार नफा झाला कारण ते आपल्यासारखे आळशी नव्हत ते हिंदुस्थानच्या कला शिकून इकडून जो माल न्यावयाचा तो तेथेंच करूं लागले, त्यामुळें तेथल्या तेथेंच सर्व पैसा राहूं लागला. याचे नांव काम. नाहीं तर आह्मी आमची जानवी देखील इंग्लंडांतून आलीं तर घ्यावयास कमी करणार नाहीं मात्र

ह्याचा खप थोडा ह्मणून इंग्लिश लोक आणीत नाहीं. ण की आह्मांस सोवळें नेसावयाचे मुगटे वगैरे येतातच न,हेत. जेवावयास सोवळे वगैरे धर्मवेडाच्या गोष्टी ह्मणून अ,ग न लोक समजतात. तथापि त्यापासून त्यांचा नफा ,शावयाचा तो होतोच. तसेंच अमेरिकन लोक तरी त्या ग्रजांची पिलें त्यांचा पराक्रम पहा. अमेरिकेंत चीन देशचा चहा इंग्लीश लोक नेत त्यामुळें त्यांस नफा फार होई व त्यामुळें अमेरिकन लोकांसही चहाचे व्यसन फार लागलें होतें. इंग्लिश लोकांची चंचु प्रवेशे मुसल प्रवेशः ही तर वहिवाटच आहे त्यांनीं चहावर फारच जकात बसविली. अमेरिकन लोकांनीं हें देशनाशाचें कारण समजून विचार केला कीं, चहाच्या जागीं दुसरा कांहीं पदार्थ योजावा, परंतु चहा अगदीं घ्यावयाचा नाहीं. असा बेत करून सर्वांनीं जितेंद्रियता धरून चहा पिणें सोडून दिले. बंदरांत इंग्रजांचीं शेंकडों गलबतें चहानें भरलेलीं होतीं. परंतु पैशाचा सुद्धां माल खपला नाहीं वारे! वा! याचें नांव देशप्रीती! नाहीं तर आह्मी देश घातुक. मित्रहो! विचार करा, वस्त्र पात्र, भांडीं कुंडीं, कागद, शाई, लेखणी वगैरे रोजच्या निर्वाहाच्या पदार्थापासून तों चैनीच्या पदार्थां पावेतों सर्व पदार्थ बाहेरल्या देशांतले आपण वापरीत आहों अशींच दहा वीस वर्षं स्थीति राहिली तर आपल्या नाती पणतींच्या नाकांतून पितळेचा गाडा आणि कांचेचीं मोत्यें अशा नथा पडण्याची वेळ येईल ह्मणून होतील तितके हाल सोसून परदेशाहून आलेल्या मालाचा होईल तितका खप कमी करा. बरे असें आपण केले तरी सतत हाल सोसणें कोणाच्यानें होणार नाहीं, ह्मणून वि-

लायतेसारखें चांगलें जिन्नस आपल्या देशांत उत्पन्न करण्याची लवकर तजवीज करावी ही गोष्ट सर्वांनीं मनांत आणल्यास अशक्य आहे असें नाहीं. आमच्या देशांतील लोक इतर कोणत्याही देशांतल्या लोकांपेक्षां कमी कुशलवान आहेत असें नाहीं फक्त त्यांस एकवार शिकवून मार्गास मात्र लावले पाहिजे. या गोष्टीस एक मार्ग दिसतो तो हा कीं मोठें भांडवल जमा करून त्याचे खर्चानें, इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे देशांतून यंत्र व त्याचे काम शिकलेले कसबी मोठमोठाले पगार देऊन चांगलें यंत्र शास्त्रांत कुशल असे लोक आणून येथें आपल्या लोकांस शिकवून माल तयार करण्याचे कारखाने सुरू करावे, हा उपाय केला असतां भांडवलाचा पैसा उत्पन्न होऊन एकवार लोकांस नफा समजला ह्मणजे आपल्या आपण शेंकडें लोक कारखाने चालतील. असें जाहले ह्मणजे देशांत माणसास काम उत्पन्न होईल. एथल्या येथेंच कच्या मालाचा पक्का माल झाल्यामुळें भाड्याचा वगैरे खर्च न पडून वस्तु स्वस्त मिळतील. याकरितां परदेशांतील चांगले हुशार गुरु आणून त्यांच्याकडोन येथील लोकांस अशी विद्या शिकविली पाहिजे कीं त्यापासून देशास खरा नफा होईल. समुदायानें व्यापार करण्यांत नफे किती आहेत हे तर सर्वांस माहितच आहे कारितां देशबांधवास सविनय ग्रंथकाराची प्रार्थना आहेकीं देशकाल वर्तमान इकडे लक्ष देऊन मत्सर वगैरे जे आपणास छळणारे शत्रु ते एकीकडे टाकून एकीनें बांधवाप्रमाणें प्रेम ठेवून ईश्वराच्या कृतीची स्मृती व भीति बाळगून सचोटीनें व्यवहार आरंभिल्यास जगदीश लौकर आपली इच्छा सफल करील.

# आर्यधर्म

हें पुस्तक घेणारांस सर्वांत मोठें बक्षीस

## १००० रुपये

एकंदर बक्षिसें आठ हजार रुपयांचीं आहेत.

विशेष माहिती हस्तपत्रकांत अगर मंडळीच्या आफिसांत.

व्यवस्थापक—बी. व्ही. नागपुरकर.

पत्ता-गंगाधर गोविंद पोतदार बुकडेपो काळकादेवी मुंबई